बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१३ गोंदिया | अंक ४१ | बुधवार, दि.१८ सप्टेंबर २०२४ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध


## अखेर पूल कोसळलाच...! देवरी-चिचगड-गडचिरोली रस्ता बंद

■ जीर्ण आणि धोकादायक पूलांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर
■ वरवर रस्ता दुरूस्ती करणारे रस्ता बांधकाम विभाग अजूनही झोपेतच
■ रस्ता बंद झाल्याने नागरिक, रुग्ण, विद्यार्थी आणि वाहन धारकांची कुचंबना



सुरेश भदाडे

**देवरी:-** देवरी ते चिचगड गावाला जोडणारा राष्ट्रीय महामार्ग क्र.५४३ वरील सालई-अब्दुलटोला दरम्यान असलेला जीर्ण पूल अखेर आज सकाळी ६ वाजे दरम्यान कोसळला. परिणाम ी, या मार्गावरील रहदारीचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून राष्ट्रीय म हामार्ग असल्याने प्रशासनापुढे पेच निर्माण झाला आहे. या घटनेमुळे सार्वजनिक बांधकाम विभागाचे पितळ उघडे पडले असून जून्या जीर्ण आणि धोकादायक पुलांच्या ऑडिटचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. दरम्यान, निवडणुकीवर डोळा असल्याने विविध भूमि पूजन कार्यक्रमांच्या माध्यमातून मतदारांना आकर्षित करण्यात व्यस्त असलेले आजी माजी आमदार-खासदार हा विषय कसा हाताळतात, तेही पाहणे महत्वाचे ठरणार आहे..दरम्यान आमदार सहसराम कोरेटे यांनी घटनास्थळी धाव घेत संबधित विभागाच्या अंभियंत्याना पाचारण करुन तत्काळ पर्यायी व्यवस्था करण्याचे निर्देश दिले.

सविस्तर असे की, नागपूर-रायपूर राष्ट्रीय महामार्ग क्र.५३ वरील देवरी येथून बालाघाट-आलापल्ली राष्ट्रीय महामार्ग क्र ५४३ हा महत्वाचा राष्ट्रीय महामार्ग जातो. या महामार्गावर अनेक ठिकाणी जूने जीर्ण झालेले पूल आहेत. या जीर्णावस्थेत गेलेल्या पूलांची दुरूस्ती न करता वरून रस्ते बांधकामांवर शासनाचा निधी उधळला जात आहे. रस्ते दुरूस्ती करताना या पूलांचा स्ट्रक्चरल ऑडीट संबंधित विभाग करतो की नाही, हे गुलदस्त्यातच आहे. वरवर रस्ता दुरूस्ती करून नेते अधिकारी मलई वाटून मोकळे होत असल्याचे आरोप काही नवीन राहिले नाहीत. मात्र, यामुळे रस्ता अपघात होण्याचे प्रमाणे दिवसेंदिवस वाढत चालले आहे.

असाच एक प्रकार आज सकाळच्या सुमारास घडला. देवरीवरून सुमारे ५ किमी अंतरावर सालई आणि अब्दुलटोला दरम्यान एक जीर्ण पूल आहे. त्या पुलावरील संरक्षक कठडा सुद्धा काही वर्षापूर्वीच तुटला आहे. असे असताना त्या पुलाची दुरुस्ती करण्याचे साधे सौजन्य शासन-प्रशासनाने दाखविले नाही. यावरून आदिवासी मागास भागातील जनतेच्या जिविताची काळजी शासन कशी घेते, हे स्पष्ट होते. हा पूल सकाळी ६ वाजे दरम्यान कोसळला. सकाळी फिरायला जाणा?्या नागरिकांनी प्रसंगावधान राखल्याने संभाव्य अपघात टळले. मात्र, देवरी कडून चिचगडच्या दिशेने जाणारा एक ट्रक त्या कोसळलेल्या पूलावरून उसळून दुस?्या बाजूला निघून गेला. संबंधित वाहन वेगात असल्याने तो पूलाच्या दुसऱ्या बाजूला निघाला. त्यापूर्वी चिचगड कडून येणा?्या दोन दुचाकींपैकी एक त्या कोसळलेल्या पूलात घुसली. दुचाकीस्वाराचे आपल्या वाहनावर नियंत्रण असल्याने संभाव्य अपघात टळला. तर मागून येणाऱ्या दुसऱ्या दुचाकीस्वाराच्या मदतीने खाली पडलेल्या दुचाकीला काढण्यात यश आले. दरम्यान, हे दोन्ही वाहनचालक आपली गाडी नाल्यातून काढत असताना देवरीकडून वेगाने जाणारा वाहन अखेर नाल्यात घुसला. मात्र वाहन वेगात असल्याने तो वाहन दुसऱ्या बाजूला निघण्यात यशस्वी झाला.

सूत्रांनी दिलेल्या माहितीप्रम ाणे, सदर पूल कोसळण्याच्या प्रक्रियेला काल सायंकाळपासूनच




सुरवात झाली होती. हा पूल रात्री कोसळला असता तर अनेक वाहनांचा याचा फटका बसून मोठ्याप्रमाणावर जिवीत आणि आर्थिक नुकसान झाले असते.

हा महामार्ग नक्षलग्रस्त, आदिवासी, मागास आणि अतिसंवेदनशील भागातून जात असतो. तसेच चिचगड ते देवरी या दोन गावांना जोडणारा प्रमुख जडवाहतुकीचा मार्ग आहे. या प्रमुख मार्गावरून विकासाच्या पोकळ बाता करणारे गडचिरोली लोकसभा आणि देवरी आमगाव विधानसभा क्षेत्रातील स्वयंघोषित विकास पुरुष सुद्धा ये जा करीत असतात. आज अपघात ग्रस्त झालेल्या पूलाची निर्मितीला सुमारे ७० वर्षाचा कालावधी झाल्याचे सांगितले जात आहे. आजच्या परिस्थितीमधे या रस्त्यावरून भारी जडवाहने मोठ्या प्रमाणावर जातात. अशात या मार्गावरील एका ही पूलाची भारसहन क्षमता वाढविण्याचा विचार करण्यात आलेला दिसत नाही. केवळ वरवर दुरुस्ती करण्यावर भर दिला जात आहे. यामुळे आजचा प्रसंग ओढविला गेल्याचे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. आतातरी या भागातील राजकीय मंडळी आणि बांधकाम विभाग आजच्या घटवेवरून धडा घेतील, अशी आशा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

पावसाळ्याच्या दिवसात सदर पूल कोसळ्याने या रस्तावरून ये-जा करणारे नागरिक, वाहनचालक, रुग्णसेवा आणि शालेय विद्यार्थी यांचे समोर गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या बाबीचा विचार करून शासन तात्पुरती का होईना, काही व्यवस्था करून शासनाने मार्ग काढावा, अशी रास्त मागणी होत आहे.

## रतनारा येथे स्वमर्जीनेच सरपंचाने केला सिमेंट रस्ता, तर विजचोरीतून महिला बचत भवनाचे बांधकाम

**गोंदिया:-** तालुक्यातील रतनारा येथे ग्रामपंचायतीच्यावतीने एका सिमेंट रस्त्याचे बांधकाम करण्यात आलेले आहे.त्या सिमेंट रस्त्याचे कार्यारंभ आदेश अद्याप निघालेले नसून १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून सदर रस्ता बांधकाम करण्याचे फक्त ठरविलेले असताना सरपंच सतिश दमाहे यांनी ग्रामपंचायतीच्या पदाधिकार्यांना विश्वासात न घेताच स्वमर्जीनेच एक आठवड्यापुर्वीच बांधकाम केल्याचे दिसून आले. त्यामध्ये सदर रस्त्याचे बांधकाम करतांना मोजमापाकडेही दुर्लक्ष करण्यात आले असून गुणवत्ते-वरही शंका उपस्थित करण्यात आली आहे.



महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना व स्थानिक आमदार यांच्या निधीतून तयार करण्यात आलेल्या अभिसरण योजनेतून ग्रामपंचायतीच्यावतीने पाणी टाकीजवळच महिला बचत गटाकरीता सुमारे २५ लाख रुपये किमतीच्या महिला बचत भवनाचे बांधकाम सुरु करण्यात आले आहे. मात्र सदर बांधकामाकडे लक्ष दिल्यास १२-१५ लाख रुपयातच सदर बांधकाम होत असल्याची चर्चा असून १५ सप्टेंबर रोजी या महिला बचत भवनाच्या कामावर विद्युत विभागाकडून कुठलीही परवानगी न घेता आकडा घालून विजचोरी करुन त्या चोरीच्या विजेचा वापर करीत काम करण्यात आल्याचेही बघावयास मिळाले.

या बांधकामाच्या देखरेखीकडे मग्रारोहयो अभियंतासह जिल्हा परिषदेच्या अभियंत्याचेही दुर्लक्ष स्पष्टपणे दिसून येत असून वीज विभागाने तत्काळ याप्रकरणात कंत्राटदारासह अभियंत्यावरही गुन्हा दाखल करायला हवे. या दोन्ही कामाच्या संदर्भात रतनारा येथील सरपंच सतिश दमाहे यांच्या भ्रमणध्वनीवर अनेकदा संपर्क केला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

तर ग्रामसेवक जी.एस.ठाकूर यांना विचारणा केली असता सिमेंट रस्त्याचे नियोजन १५ व्या वित्त आयोगात आहे,मात्र काम सुरु करण्यासंदर्भात कुठलीच प्रकिया झालेली नसून सरपंचानी स्वतःच काम केल्याचे सांगितले.

## समाजातील शेवटचा घटक न्यायापासून वंचित राहू नये-न्यायमूर्ती नितीन जामदार

**गोंदिया:** न्याय म्हणजे काय किंवा अन्याय झाला तर कुठे जायचे एवढीजरी माहिती मिळाली तरी न्यायाच्या दिशेने वाटचाल सुरू होते. आपल्या देशामध्ये संविधान आल्यानंतर समाजा-तील बऱ्याच घटकांना आपले हक्क काय आहेत याची माहिती नव्हती, त्यामुळे संविधानामध्ये सुधार करून आर्टिकल ३९-अ आणला गेला. यामध्ये मोफत आणि सक्षम न्याय मिळविण्याचा अधिकार सर्वांना प्राप्त झाला. ज्यामुळे आजच्या महाशिबिर हा न्यायाची वाटचाल करण्याचा अत्यंत महत्वाचा एक पाउल आहे. समाजातील पिडीत व्यक्तींसाठी सरकारविविध योजना राबविते, परंतु जोपर्यंत त्यांना माहित नसणार तोपर्यंत त्या सर्व योजना कागदावरच असतात. त्यामुळे अशाप्रकारच्या जनजागृती शिबिरामार्फत प्राथमिक माहिती पुरविण्याचा प्रयत्न केला जातो, असे उदगार न्यायमूर्ती नितीन जामदार, वरिष्ठ प्रशासकिय न्यायमूर्ती उच्च न्यायालय, मुंबई यांनी १४ सप्टेंबर रोजी पवार सांस्कृतिक भवन, गोंदिया येथे विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळावा तसेच कायदेशीर मदत संरक्षण सल्लागार प्रणाली कार्यालयाचे उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकारण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय व जिल्हा प्रशासन गोंदिया यांचे संयुक्त विद्यमाने १४ सप्टेंबर २०२४ रोजी पवार सांस्कृतिक भवन, गोंदिया येथे विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळावा आयोजित करण्यात आला होता. सदर मेळाव्याचे उद्घाटन न्यायमूर्ती नितीन जामदार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी न्यायमूर्ती नितीन सांबरे, वरिष्ठ न्यायमूर्ती उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर व न्यायमूर्ती महेंद्र चांदवाणी, उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर तथा पालक न्यायमूर्ती न्यायीक जिल्हा गोंदिया उपस्थित होते. सदर कार्यक्रमापूर्वी मान्यवरांनी कायदेशीर मदत संरक्षण सल्लागार प्रणाली कार्यालयाचे गोंदिया न्यायालय परिसरात उद्घाटन केले.

मेळाव्यास समीर अडकर, सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांची उपस्थिती होती. तसेच जिल्हाधिकारी प्रजित नायर, पोलिस अधिक्षक गोरख भामरे, मुख्य कार्यकारी अधिकारी मुरुगानंथम एम., विभागीय वनाधिकारी तुषार ढमढेरे, इतर शासकीय विभागांचे अधिकारी व जिल्ह्यातील सर्व न्यायीक अधिकारी उपस्थित होते.

## स्वच्छतेची जबाबदारी स्वीकारा-मुख्य कार्यकारी अधिकारी मुरुगानंथम

**गोंदिया :** घरातला कचरा बाहेर फफ़ेकला की कुटूंबाची जबाबदारी संपली. ग्रामपंचायतीम धील कचरा गावाबाहेर रस्त्याच्या कडेला फफ़ेकला की सरपंचाची जबाबदारी संपली. रस्त्याच्या शेजारचा कचरा प्रशासनाने कुठेतरी फफ़ेकला तर त्यांची पण जबाबदारी संपते. मग हा कचरा नदी, नाल्यात जावून प्रदूषण वाढवितो. त्यामुळे कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करा, घर-ातील निघणाऱ्या कचऱ्यासह गावातील स्वच्छतेची जबाबदारी स्वीकारा, असे आवाहन जिल्हा परिषद गोंदियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. मुरूगानंथम एम. यांनी केले.

स्वच्छता ही सेवा - २०२४ या उपक्रमांचा जिल्हास्तरीय शुभारंभ कार्यक्रम आज (ता. १७) सकाळी ८.३० वाजता गोंदिया पंचायत समिती अंतर्गत ग्रामपंचायत अंभोरा येथे पार पडला. त्यावेळी मार्गदर्शन करतांना ते बोलते होते. ग्रामपंचायतीच्या सरपंच श्रीमती जाननबाई लक्ष्मण चौधरी, उपरसंपच श्रीमती सारिकाबाई दुर्गेश सावनकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. तानाजी लोखंडे, पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. आनंदराव पिंगळे, गटशिक्षणाधिकारी श्री. पी.पी. समरीत, मुख्याध्यापक श्री. वैरागडे, शालेय शिक्षण व तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष श्री. चोप-लाल तुरकर यावेळी मंचावर उपस्थित होते. आपण सण, उत्सव, शासकीय उपक्रमांचा लाभ घेण्यासाठी एवढेच नव्हे; तर निवडणूकांसाठी सुध्दा एकत्र येतो. मग कचरा संपविण्यासाठी एकत्र का येत नाही? असा सवाल




उपस्थित करून श्री. मुरूगानंथम पुढे म्हणाले की, प्लास्टीक कचज?्याच्या वापरामुळे संपूर्ण पर्यावरण धोक्यात आले आहे. प्लास्टीकला आता आपल्या आयुष्यातून हद्दपार केले पाहीजे. त्यासाठी सर्वांनी एकत्र येवून आपल्या गावासह जिल्हयाला स्वच्छ आणि कचरामुक्त करण्याचा संकल्प करावा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तानाजी लोखंडे यांनी स्वच्छता अभियानाचा इतिहास सांगून महाराष्ट्राने दे-शाला स्वच्छतेची मोहीम दिली. त्यामुळे स्वच्छतेच्या बाबतीत महाराष्ट्र अग्रेसर ठेवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याचे मत त्यांनी व्यक्त केले. आरोग्य बिघडवून डॉक्टरांचे घर मोठे करण्यापेक्षा गावात, परिसरात स्वच्छता पाळून सुदृढ आरोग्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन करून उपमुख्य कार्यकारी आनंदराव पिंगळे यांनी स्वच्छतेच्या या दिंडीचे वारकरी होण्याचे मत व्यक्त केले. स्वच्छता ही सेवा उपक्रमांची संपूर्ण माहिती सुध्दा त्यांनी आपल्या प्रास्ताविकातून दिली. सरपंच जाननबाई चौधरी यांनी गावाची स्वच्छतेसाठी निवड केल्याबद्दल आनंद व्यक्त करून गावात शाश्वत स्वच्छतेचा मानस व्यक्त केला. ग्रामसेवक डी.एस. रेवतकर यांनी समायोचित विचार व्यक्त केले.

दरम्यान सूत्रसंचालन करून माहिती, शिक्षण व संवाद तज्ञ श्री. अतुल गजभिये यांनी उपस्थितांना स्वच्छतेची शपथ दिली. पाणी व स्वच्छता विभाग, पंचायत समिती गोंदिया आणि जिल्हा परिषदेतील कर्मचाऱ्यांसह गावकरी यावेळी मोठयासंख्येने उपस्थित होते.

एक पेड मॉ के नाम

स्वच्छतेच्या या उपक्रमात संपूर्ण जिल्हयात प्रत्येक ग्राम पंचायतींने किमान १० वृक्षांचे रोपण करण्याचे निर्देश यापू-र्वीच देण्यात आलेले आहेत. अंभोरा ग्रामपंचायतीमध्ये मा. मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. मुरूगानंथम एम, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. तानाजी लोखंडे आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. आनंदराव पिंगळे यांच्या हस्ते शाळेच्या मैदानात विविध प्रजातींच्या वृक्षांचे रोपण करुन मएक पेड मॉ के नामफया उपक्रम ाचा शुभारंभ करण्यात आला.

## राज्यात कॉँग्रेसच ठरणार सर्वात मोठा पक्ष

### पक्षाच्या सर्वेक्षणात मविआ सत्तेत येण्याचा अंदाज



| 'मविआ'तील जागांचे अंदाज - १७० ते १८५ | |
|---|---|
| पक्ष | जागांचे अंदाज |
| कॉंग्रेस | ८०-८५ |
| राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार) | ६० -६५ |
| शिवसेना (उबाठा) | ३०-३५ |
| एकूण | १७० ते १८५ |

| महायुतीतील जागांचे अंदाज - ९८ ते १०३ | |
|---|---|
| पक्ष | जागांचे अंदाज |
| भाजप | ६०-६५ |
| शिवसेना(शिंदे) | ३०-३२ |
| राष्ट्रवादी (अजित पवार) | ०८-०९ |
| एकूण | ९८ ते १०३ |

**मुंबई:** काँग्रेस पक्षाने केलेल्या एका सर्वेक्षणात राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येणार असल्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. काँग्रेस राज्यात सर्वात मोठा पक्ष ठरणार असून, भाजप हा राज्यात दुसऱ्या क्रमांकावरील पक्ष ठरणार आहे.

काँग्रेसने केलेल्या या सर्वेक्षणात महाविकास आघाडीला १७० जागा मिळण्याचा अंदाज असून महायुतीला १०० च्या जवळपास जागा मिळतील. अंदा अंदाजही वर्तविण्यात आला आहे. त्यामुळे ताडकी बहिण योजना लागू केल्यानंतरही या योजनेचा विशेष लाभ महायुतीला होताना दिसत नसल्याचे काँग्रेसच्या सर्वेक्षणात दिसत आहे.

लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने पुन्हा राज्यात दमदार कमबँक करीत सर्वाधिक १३ जागा जिंकल्या. लोकसभेच्या निकालाने राज्यातील जनतेचा कौल हा महाविकास आघाडीच्या बाजूने असल्याचे स्पष्ट झाले. महाविकास आघाडीने ४८ पैसी ३१ जागा जिंकल्या. तर २८ जागा लढून भाजप केवळ ९ जागा जिंकू शकला. त्यामुळे हाच कौल विधानसभेतही कायम राहील. असा अंदाज वर्तविला जात आहे.

काँग्रेसला सर्वात जास्त जागा

काँग्रेसने केलेल्या सर्वेक्षणात काँग्रेस पक्ष लोकसभेप्रमाणेच विधानसभेलाही सर्वात जास्त जागा जिंकेल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. विधानसभेला ८०-८५ जागा जिंकून काँग्रेस राज्यातील सर्वात मोठा ठरेल, असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. या अंदाजानुसार, काँग्रेस पक्ष विदर्भात ४० जागा जिंकू शकतो, तर मुंबईतही काँग्रेसला १० जागा मिळतील. असा अंदाज आहे.

### तिसऱ्या क्रमांकावर शिवसेनेच्या दोन्ही गटात स्पर्धा

**महाविकास आघाडीत सर्वात कमी म्हणजे ३० ते ३५ जागा ठाकरे गटाला मिळण्याची शक्यता आहे. तसेच शिंदे गटाला ३० ते ३२ जागा मिळतील, असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. लोकसभा निवडणुकीतही सर्वाधिक २१ जागा लढून ठाकरे गटाला महाविकास आघाडीत सर्वात कमी ९ जागा जिंकता आल्या. ठाकरेंच्या कामगिरीचा हा कल विधानसभेतही कायम राहील. असे सर्वेक्षणात स्पष्ट झाले आहे. मुंबईत ठाकरे गटाची उत्तम कामगिरी होणार असली, तरी ठाण्यात मात्र शिंदे गट उत्तम कामगिरी करेल, असेही सर्वेक्षणात म्हटले आहे.**

### दुसऱ्या क्रमांकासाठी भाजपल शरद पवार गटात चुरस

**काँग्रेसच्या सर्व्हेनुसार, दुसऱ्या क्रमांकासाठी भाजप, शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये चुरस असेल. तर त्यानंतरच्या क्रमांकासाठी उध्दव ठाकरे यांची शिवसेना आणि एकनाथ शिंदे यांची शिवसेना यांच्यात स्पर्धा पाहायला मिळू शकते. २०१४ व २०१९ या दोन्ही विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपने १०० हून अधिक जागा जिंकल्या होत्या. मात्र यावेळेस कोणत्याच पक्षाला शंभरी ओलांडता येणार नाही. २०१९ साली १०५ जागा जिंकणारा भाजप यावेळेस ६० ते ६५ जागा जिंकू शकतो. याचा अर्थ विधानसभा निवडणुकीत सर्वात मोठा फटका भाजपला बसेल, असा अंदाज आहे. जुलैमध्ये भाजपनेही एक सर्वेक्षण केले. त्याचा तपशील ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात समोर आला. त्यानुसार भाजपला विधानसभा निवडणुकीत ५५ ते ६५ जागा मिळण्याची शक्यता आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने लोकसभा निवडणुकीत सर्वाधिक स्ट्राईक रेट दाखवत १० पैकी ८ जागा जिंकल्या. विधानसभा निवडणुकीतही पवार ट ५० ते ५५ जागा जिंकू शकतो, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.**

### अजित पवार गटाची सर्वात निराशाजनक कामगिरी

**अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची कामगिरी लोकसभेप्रमानेच विधानसभेलाही सर्वाधिक निराशाजनक होण्याची शक्यता आहे. लोकसभा निवडणुकीत केवळ एक जागा जिंकणारे अजित पवार यांच्या पक्षाला विधानसभा निवडणुकीत ८ ते ९ जागा जिंकता येतील. असा अंदाज काँग्रेसच्या सर्वेक्षणात व्यक्त करण्यात आला आहे.**



## मुरबार येथील ऑईल मिलला भिषण आग, लाखोंचे नुकसान

**गोंदिया:** जिल्ह्यातील मुरपार येथे सोमवारी (दि.१७) मध्यरात्री आगीचा थरार बघायला मिळाला. गोंदिया शहराच्या लगतच असलेल्या मुरपार या ठिकाणी ऑइल मिलला रात्री १ वाजताच्या दरम्यान भीषण आग लागली. यावेळी मिलमध्ये कामावर असलेल्या ३५ मजूरांना सुखरुप बाहेर काढण्यात आले. मात्र, मिल मालकाचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. शहरापासून काही किमती अंतरावर मुरपार हे गाव असून येथे जिमी गुप्ता याया मालचीकी ऑईल मिल आहे. दरम्यान मिलमध्ये धानाच्या कोंड्यापासून तेल काझण्याच काम सुरु होते. त्यातच रात्री १ वाजताच्या सुमारास अचानक मिलमध्ये आग लागली. काही क्षणातच आगीने रौद्र रुप धारण केले. यावेळी ३५ मजूर कामावर होते. घटनेची माहिती अग्नीशमन विभागाला देण्यात आली.


## पाहिजेत

**लक्ष्मी शिक्षण संस्था व क्रिडा मंडळ केसलवाडा/वाघ द्वारा संचालित**

**स्व. निर्धनराव पाटील वाघाये अध्यापक विद्यालय (डी.एल.एड.)**

**सडक अर्जुनी, ता.स./अर्जुनी, जि. गोंदिया सत्र २०२४-२५ करिता पदे भरणे आहे.**

| अ.क्र. | पदाचे नाव | विषय | पद संख्या | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|---|
| १ | प्राचार्य | --- | १ | M.A./M.Sc.M.Ed 55% गुणासह ५ वर्ष अध्यापनाचा अनुभाव |
| २ | अधिव्याख्याता | पायाभूत विषय | १ | M.A./M.Sc.M.Ed 55% गुणासह किंवा Education 55% गुणासह |
| ३ | अधिव्याख्याता | इंग्रजी,गणित,विज्ञान सामाजिक अभ्यास | ३ | M.A./M.Sc.B.Ed 55% गुणासह |
| ४ | अधिव्याख्याता | संगित/चित्रकला | १ | M.A.Fine Art/Music संगीत विषारद 55% गुणासह |
| ५ | अधिव्याख्याता | शारीरिक शिक्षण | १ | M.P.Ed 55% गुणासह |
| ६ | ग्रंथपाल | ---- | १ | B.Lib/M.lib |
| ७ | वरिष्ठ लिपीक | ------- | १ | पदवीधर MSCIT |
| ८ | संगणक निर्देशक तथा भांडारपाल | ------ | १ | पदवीधर MSCIT |
| ९ | परिचर | ---- | १ | १० वी, १२ वी |

इच्छुक अर्हता धारक उमेदवारानी शैक्षणिक पात्रतेच्या कागदपत्रासह (२ फोटोसह) दि. १७/०९/२०२४ सोमवार वेळ १२.०० वा. स्व. निर्धनराव पाटील वाघाये अध्यापक विद्यालय (डी.एल.एड.) सडक अर्जुनी येथे स्वखर्चाने उपस्थित राहावे.

**अध्यक्ष/सचिव**
**लक्ष्मी शिक्षण संस्था व क्रिडा मंडळ केसलवाडा/वाघ**

**प्राचार्य**
**स्व.निर्धनराव पाटील वाघाये अध्यापक विद्यालय सडक अर्जुनी**

## संपादकीय

### कायद्याच्या कात्रीत आता “बुलडोझर” कारवाई

अनधिकृत बांधकामांवर बुलडोझरने कारवाई व्हावी अशी सर्वसामान्य जनतेची इच्छा असते. त्याचे कारण अनेकदा प्रशासनाकडे पत्रव्यवहार करूनसुद्धा कारवाई होईलच याची कोणाला खात्री नसते. राज्याची सूत्रे हाताळणारा मुख्यमंत्री जर कणखर नेतृत्व करणारा असेल, तर त्याचे कौतुक होते. लोक त्याला डोक्यावर घेतात. बलात्कारासारख्या गंभीर गुन्ह्यांतील आरोपी असो, नाही तर खतरनाक गुंड असो. त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई होत असतानाच, स्थानिक प्रशासनाकडून संबंधित आरोपीच्या बेकायदेशीर बांधकामांवर तत्काळ कारवाई करण्याचा फंडा हा सध्या जनतेत लोकप्रिय झाल्याने जनतेकडूनच उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना बुलडोझर बाबा या नावाने लोक संबोधू लागले आहेत.

देशात कायदा आहे; परंतु त्याची अंमलबजावणी वेळेवर होत नसल्याने प्रशासनाबाबत उदासीनता असते. त्यामुळे अशा बेधडक बुलडोझर कारवायांसाठी जनतेची मूक संमती असते, असे आतापर्यंत दिसून आलेले आहे. त्याचवेळी उत्तर प्रदेश सरकारच्या धर्तीवर महाराष्ट्र, मध्य प्रदेश, राजस्थान, गुजरात या भाजपाप्रणीत राज्यात बुलडोझर कारवाईचा धमाका २०२० नंतर सुरू झाला आहे.

या कारवाईबाबत गुन्हेगारांबद्दल तिडीक असलेल्या समाजामधून राज्य सरकारच्या कृतीबाबत समाधान व्यक्त केले जात असले तरी, दुखवणारा एक वर्ग काही प्रमाणात असतो. त्याच दुखावलेल्या मानसिकतेतून काही संस्थांकडून सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. आरोपींच्या घरावर मनमर्जीप्रमाणे बुलडोझर चालवण्याच्या कारवाईला मनाई करा, अशी ती याचिका होती. गुन्हेगारी कारवायांमध्ये गुंतलेल्या व्यक्तींशी संबंधित असलेल्या मालमत्ता पाडण्यासाठी बुलडोझर वापरण्याच्या प्रथेशी संबंधित अनेक प्रकरणे सर्वोच्च न्यायालयात आली होती. याला अनेकदा “बुलडोझर न्याय” असे संबोधले जात होते. याच बुलडोझर न्यायच्या संकल्पनेला आव्हान देण्यात आल्याने या सर्व याचिकांवर एकत्रित सुनावणी करण्यात आली. यूपी, मध्य प्रदेश, राजस्थानात बुलडोझर कारवाईचा उल्लेख करत अल्पसंख्याकांना टार्गेट केले जात आहे, असाही आरोप याचिकेतून करण्यात आला होता.

सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती बी. आर. गवई आणि के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर काल सोमवारी सुनावणी झाली. त्यावेळी केंद्र सरकारची बाजू मांडणारे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी असा युक्तिवाद केला की, संबंधित पालिकेच्या कायद्याचे उल्लंघन होत असेल तरच आम्ही कारवाई करतो. उत्तर प्रदेशात मालमत्ता पाडण्यापूर्वी संबंधितांना नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. त्यांनी उत्तर न दिल्यानंतर अनधिकृत बांधकामे पाडण्यात आली. कोणत्याही स्थावर मालमत्तेचा मालक किंवा रहिवासी फौजदारी गुन्ह्यांमध्ये सहभागी आहे, या एकमेव कारणावरून अशा प्रकारची कोणतीही मालमत्ता पाडलेली नाही, असे तुषार मेहता यांनी खंडपीठाच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न केला.

मात्र सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारचा युक्तिवाद अमान्य केला. केवळ दोषी असल्याच्या आधारे कुणाचेही घर पाडणे योग्य नाही. जर कुणी दोषी असेल तर त्याचे घर पाडले जाऊ शकत नाही, असे सांगत सुप्रीम कोर्टाने बुलडोझर कारवाईवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. मात्र सार्वजनिक रस्त्यांवरील अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे, अगदी मंदिरांनाही संरक्षण देणार नाही, असेही खंडपीठाने स्पष्ट केले. त्याचवेळी घरे आणि इमारती पाडण्याबाबतच्या चिंतेचे निराकरण करण्यासाठी संपूर्ण भारतातील मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यात येतील, असेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. त्यावर सॉलिसिटर जनरल तुषार मेहतांनी कोर्टाचे आदेश मान्य केले. त्याशिवाय बुलडोझर कारवाई अवैध बांधकाम बांधल्या प्रकरणी केली आहे, असे मेहता यांनी कोर्टात बाजू मांडत सांगण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी पुढील सुनावणी १७ सप्टेंबरला होणार आहे.

उत्तर प्रदेशातील मुख्यमंत्री योगी यांच्याप्रमाणे महाराष्ट्रातही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कामाचे कौतुक करणारे पोस्टर जून-जुलै महिन्यात ठाण्यात झळकले होते. “महाराष्ट्राचा बुलडोझर बाबा’ असा मजकूर असणारे पोस्टर मुख्यमंत्र्यांच्या जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरला होता. मुख्यमंत्री शिंदे यांनी अनधिकृत पब आणि बारवर कारवाईचा बडगा उगारत, बार बुलडोझरने जमीनदोस्त केले होते. त्याचप्रमाणे, पुण्यातील हॉटेल्समध्ये ड्रग्जची विक्री केली जात असल्याचे समोर आले. याचे राज्यभर पडसाद उमटले. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या आदेशानंतर हॉटेल्सवर बुलडोझरने कारवाई केली होती. त्याचे कौतुक झाले होते. याउलट, राज्यात महाविकास आघाडी सरकार असताना, अभिनेत्री कंगना राणावत यांच्या खार येथील फ्लॅटवरील बांधकाम मुंबई महापालिकेने नोटीस न देता पाडल्या प्रकरणी तिला नुकसानभरपाई द्यावी, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने देत राज्य सरकार आणि मुंबई महापालिकेने आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले होते. तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याविरोधात बोलल्यामुळे तिला अडचणीत आणण्यासाठी, टार्गेट करण्यासाठी तोडकाम कारवाई केली होती, असा आरोप त्यावेळी कंगना राणावत हिने केला होता. त्यामुळे उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान या राज्यांत बुलडोझर कारवाईला विशिष्ट धर्मीयांनी हरकत घेतली असली तरी, भाजपा सत्तेत नसतानाही असे बुलडोझर चालवले गेले होते, ही बाब या निमित्ताने पुढे आली आहे. आता सर्वोच्च न्यायालय बुलडोझर कारवाईबाबत काय सूचना देते याकडे देशवासीयांचे लक्ष लागले आहे.

## निंबा येथिल मामा तलावाची पाळ फुटली

**गोरेगाव-** तालुक्यातील ग्राम निंबा क्षेत्रात दि. ०९ ते ११ सप्टेंबर दरम्यान अतिवृष्टी झाली त्यामुळे येथिल गट क्रमांक ४७० माजी मालगुजारी तलावात मोठ्याप्रमाणात पाणी जमा झाला आहे त्यामुळे तलाव ओव्हर फ्लो झाला व पाळीला छोटा छिद्र पळला होता. तो मोठा होऊ नये म्हणून जवळच्या शेतकऱ्यांनी बोरीमध्ये माती भरून पाण्याचा प्रवाह बंद करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु पाणी जास्त असल्याने प्रवाह वाढून हळूहळू तो छिद्र मोठा झाला व दि. १३ सप्टेंबर शुक्रवारला जोरात पाऊस आल्यामुळे माजी मालगुजारी तलावाची पाळ फुटली व जवळच्या शेतकऱ्यांच्या धान पिकाचे नुकसान झाले आहे. याची तक्रार सरपंच वर्षाताई पटले यांनी मृदा व जलसंधारण विभाग गोंदिया येथे केली असता संबंधित जलसंधारण अधिकारी तुषार मानकर व ऊके यांनी दि. १४ सप्टेंबर शनिवारला तलावाची पाहणी केली.

यावेळी वर्षाताई पटले सरपंच ग्रा.प. निंबा, रमेश पंधरे पं.स. सदस्य गोरेगाव, पुरुषोत्तम कटरे उपसरपंच ग्रा.प. निंबा, नंदलाल ऊईके सदस्य ग्रा.प. निंबा, संजय शहारे ग्रा.प. सदस्य निंबा, मालताताई भगत सदस्य ग्रा.प. निंबा, बुधराम बिजेवार अध्यक्ष तंटामुक्त समिती निंबा, विजय पटले, छगन कुमडे, भैयालाल कुमडे, टेकराज कुमडे, गणेश भगत, प्रेमलाल मसे, तेजराम ठाकरे, देवचंद ठाकरे, गावकरी व शेतकरी उपस्थित होते.

पाण्याचा प्रवाह वाढून पाळ जास्त फुटू नये म्हणून ग्राम पंचायतच्या पुढाकारातून शेतकरी व गावकरी मिळून सिमेंट च्या बोरीमध्ये माती दगड भरून कसाबसा तात्पुरत्या स्वरूपात तलावाची पाळ सुधारली असून



पाण्याचा प्रवाह कमी झाला आहे. पण प्रवाह असाच सुरू राहिल्यास पाळ आणखी जास्त फुटण्याची शक्यता आहे.

या माजी मालगुजारी तलावाला पाण्याचा मोठ्याप्रमाणात येना आहे. जंगलालगत असल्याने जंगलातील पाणी तलावातच येत असतो पण या तलावाला पाळ मजबूत नसल्याने त्याची पाळ फुटली असून खुप पाणी वाया जात आहे. जर पाळ फुटून पाणी वाहत राहिला तर जंगलातील जनावरे व गावातील जनावरांना हिवाळ्यात व उन्हाळ्यात पाणी टंचाई निर्माण होईल म्हणून संबंधित विभागाने यावर लवकरात लवकर योग्य ती कारवाई करून पाळ सुधारावी जेणेकरून पाणी वाया जाऊ नये अशी मागणी गावकरी व शेतकऱ्यांकडून होत आहे.संबंधित विभागाकडून लवकरात लवकर निधी मंजूर करून सदर तलावाच्या फुटलेल्या पाळीचे काम पूर्ण व्हावे अशी मागणी सरपंच वर्षाताई पटले यांनी प्रशासनाकडे केली आहे.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबावदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# व्यवस्था परिवर्तन हवे तर सत्ता हस्तगत करणे गरजेचे




## अरुण गाडे : राष्ट्रीय आरक्षण परिषदेतून एल्गार



**नागपूर :** आरक्षण संविधानाने दिले असताना सरकार ते काढून घेण्याची भाषा करत आहे. उपवर्गीकरणासारखी गुंतागुंत निर्माण करून संविधानिक अधिकार नाकारते, हे अन्यायकारक असून संविधानिक नीतिमत्तेचे तत्त्व नाकारणारी कृती आहे. आता आंदोलना सोबतच सर्व दलित बहुजनांनी संविधानाशी एकनिष्ठ राहून परिवर्तनासाठी सत्ता हस्तगत करावी लागणार आहे, असे परखड मत आरक्षण परिषदेचे अध्यक्ष कामगार नेते अरुण गाडे अध्यक्ष काष्ट्राईब महासंघ यांनी आज येथे व्यक्त केले.

आरक्षण बचाव समन्वय समितीच्या वतीने राष्ट्रीय आरक्षण परिषद आयोजित करण्यात आले. परिषदेच्या अध्यक्षपदावरून कामगार नेते गाडे बोलत होते. यावेळी मंचावर सर्वोच्च न्यायालयाचे अधिवक्ता अॅड. श्रेयश गचे, प्रा. एन व्ही. ढोके, अॅड. रमेश पिसे, आरोग्य विभागातील सहसचिव अशोक आत्राम, विश्वदीप करंजीकर, उपस्थित होते. गाडे म्हणाले, दलित आदिवासी बहुजनांनी सांविधानाशी बांधिलकी ठेवून काम करणे, लोक कल्याणासाठी झटणे, समाजाच्या वंचित शोषित वर्गासाठी एक पाऊल पुढे टाकण्याची गरज निर्माण झाली असून परिवर्तनाच्या या लढ्यात सत्ताधाऱ्यांना सत्तेवरून खाली खेचण्याची वेळ आली आहे. आरक्षण परिषदेचे उद्घाटन करताना माजी मंत्री तसेच राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे अध्यक्ष बबनराव घोलप यांनी आरक्षणाच्या प्रश्नावरून सर्व मागासवर्गीय जाती जमाती एकत्र येत असताना अचानक अनुसूचित जाती व जमातीच्या उपवर्गीकरणाचा विषय पुढे आणला. या अनुसूचिला अ, ब, क, ड वर्गीकरण करण्यासाठी संविधानात तरतूद नाही. यामुळे येणाऱ्या काळात आरक्षणाची भूमिका समजावून सांगण्यासाठी देशभरात प्रबोधन करण्यासाठी सभा घेण्यात येईल, असे घोलप म्हणाले. संचालन राहुल मुन, भूमिका सुशील तायडे यांनी मांडली

**बहुजनांना आरक्षणाला मुकावे लागणार**

अॅड. श्रेयश गचे यांनी उपवर्गीकरणामुळे येणाऱ्या काळात दलित आदिवासी बहुजनांना आरक्षणाला मुकावे लागणार आहे. प्रा.एन.व्ही. ढोके यांनी देशात प्रबळ विरोधी पक्ष म्हणून रिपब्लिकन पक्षाची ताकद होती. परंतु रिपब्लिकन पक्षाची ताकद लयास गेली आणि या सत्ताधाऱ्यांना रान मोकळे झाले. विश्वदीप करंदीकर म्हणाले, मागासवर्गीयांचा अनुशेष भरणे, सरळसेवेची आणि पदोन्नतीची पदे १०० टक्के भरली जात नाहीत. संचालन प्रा राहुल मुन, भूमिका -सुशील तायडे यांनी मांडली विविध परिसंवादात माजी सनदी अधिकारी किशोर गजभिये, अशोक कांबळे,भीम आर्मी, डॉ नितीन कोळी,एस के भंडारे, प्रा. जावेद पाशा, प्रा. नामा जाधव, अरविंद गेडाम,वैभव कांबळे, आकाश फुलझेले, अमन कांबळे, उमेश कोर्राम, राहुल सोनपिंपळे यांनी विचार व्यक्त केले. प्रा. रणजित मेश्राम यांच्या उपस्थितीत समारोप झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा म धुकर उईके,गोपल भारती, संयुक्त मोर्चा श्याम निलंगेकर नांदेड, राजेंद्र साठे उपस्थित होते. २३ ठराव पारित करण्यात आले त्याचे वाचन रणजित रामटेके यांनी केले. संचालन मीना भागवतकर, आभार डॉ जयप्रकाश बागडे यांनी केले

**मान्यवरांचा सत्कार**

परिवर्तनाच्या चळवळीत समर्पित भावनेतून कार्य करणा?या माजी न्यायाधीश चंद्रलाल मेश्राम, धम्म कार्यकर्ता, पुष्पाताई बौद्ध, माजी प्राचार्य डॉ. बबनराव तायवाडे, प्राचार्य डॉ प्रकाश राठोड गीतकार गायक अनिरुद्ध शेवाळे सामाजिक कार्यकर्ते मच्छिंद्र साळवे या मान्यवरांचा डॉ बाबासाहेब आंबेडकर जीवन गौरव पुरस्कार देऊन सत्कार आरक्षण परिषदेत करण्यात आला. श्यामराव हाडके,रवी पोथारे,विनोद मेश्राम, सिताराम राठोड, लीलाधर कानडे, जयंत इंगळे, यशवंत माटे, सुनंदा गायकवाड, प्रतिभा खोब्रागडे, कविता मडावी, विनोद बनसोड, राजेश ढेंगरे, मनोहर चव्हाण, सुरेश तामगाडगे व अनेकांनी सहकार्य केले. सुरुवात एम एस जांभुले लिखित व डॉ विना राऊत दिग्दर्शीत मिशन -२०२४ लघु नाट्य सादर करण्यात आले.

## रामस्वामी पेरियार नायकर


‘आशियाचे सॉक्रेटिस’ म्हणून ओळखले जाणारे रामस्वामी पेरियार यांचा पशुपालन करणाऱ्या धनगर जमातीत १७ सप्टेबर १८७९ रोजी जन्म झाला. त्यांचा मृत्यू २४ डिसेंबर १९७४ रोजी झाला.

रामस्वामींनी इ. स.१९२५ मध्ये त्यांनी ‘सेल्फ रिस्पेक्ट मुव्हमेंट’ सुरू केली. अण्णा दुराई, करूणानिधी यांनी ही चळवळ निरंतर मजबूत केली. अब्राह्मणी राजकीय चळवळ देशात सर्वात मजबूत आहे ती केवळ तामिळनाडू मध्येच.

‘सामाजिक क्रान्ती के अजेय योद्धा पेरियार ई. वी. रामास्वामी’ या पुस्तकाचे लेखक श्री ब्रजलाल वर्मा हे पेरियार रामास्वामी नायकर धनगर असल्याचे स्पष्ट करतात. त्यांचे हे पुस्तक भावना प्रकाशन, ९०, टैगोर टाउन, इलाहबाद यांनी १९९५ - ९६ मध्ये प्रकाशित केलेले आहे. लेखकांनी पृष्ठ क्रमांक सहावर शेवटच्या परिछेदात दिलेली माहिती पुढील प्रमाणे :

‘रामास्वामी अपने बाल्यकाल से ही ब्राह्मणवादी व्यवस्था द्वारा प्रचलित कर्मकांडों, पूजा - पाठों और इनके माध्यम से अब्राह्मण जनता के शोषण का घोर विरोधी था। यही कारण था कि एक गडरिया (नायकर) परिवार का बालक तामिलनाडु ही नहीं प्रत्युत संपूर्ण देश का पेरियार (महापूरूष) सिद्ध हुआ ।’ हिंदी भाषिक प्रदेशात धनगरांना गडरिया संबोधले जाते.

पेरियार रामस्वामी नायकर यांनी देवाच्या, धर्माच्या, वर्णाच्या व जातीच्या उच्च मानसिकतेतून वैदिकांच्या शोषणा विरूद्ध प्रचंड आव्हानात्मक बहूजनांच्या सामाजिक परिवर्तनाची लढाई लढली. धार्मिक थोतांड तथा दंतकथा पूर्ण साहित्य क्षेत्रातील वैदिकांची मक्तेदारी मोडून काढली. बहूजन समाजाचे मानसिक परिवर्तन केले. आजही त्यांचे नाव घेतल्याशिवाय दक्षिण भारतात भाषणाचा प्रारंभच होत नाही. एवढा मान ज्या महापूरूषाला आहे त्या रामस्वामी नायकर यास बहुजनांसह प्रामुख्याने धनगरांनी



आपल्या हृदयात व मस्तिष्कात स्थान देणे गरजेचं आहे. त्यांचा विस्तृत अभ्यास करणं व विपुल साहित्य निर्मिती करणं गरजेचं आहे.

आपल्या अनभिज्ञपणामूळे, ऐतिहासिक दूर्लक्षीतपणामुळे, वैदिक मानसिकतेच्या झपाटलेपणामुळे आमच्या महापूरूषांना इतरांनी हायजॅक केले. कित्येकांवर वैदिकीकरणाचे आवरण चढवले. आपणच जर आपल्या महापूरूषांना जपत नसू; त्यांचे विचार आत्मसात करून त्यावर वाटचाल करत नसू तर ते काळाच्या पडद्या आड विस्मृतीत ढकलले जातात. त्यांच्या विचारावर जाणिवपूर्वक काजळीचे आवरण टाकल्या जाते. म्हणून निरंतर जागृत राहणे आवश्यक आहे. महापूरूषांना एखाद्या जातीत बंदिस्त करणे हे जसे अयोग्य आहे ; तसेच इतर समाज घटक स्वीकारत असतांना किमान त्यांच्याच समाज समूहाने त्यांना न मानणे, न स्वीकारणे हे देखील लाजिरवाणी अवस्थेशिवाय धोक्याची घंटा आहे.

त्यांनी ब्राह्मणी वैदिक संस्कृतीच्या देव, धर्म, पुराण, महाकाव्य, वेद, विषमता यांची चिरफाड करून ब्राह्मणेतरांच्या शोषणा विरुद्ध लढा उभारला. ज्यांनी ब्राह्मणी वैदिक व्यवस्थेविरुद्ध ब्राह्मणेत्तर बहुजनांची लढाई लढली. ब्राह्मणी मानसिकतेच्या प्रभावाने पछाडलेल्यांना, मानसिक गुलाम बणलेल्यांना पेरियार स्वीकारायला कठीण होऊन जातात. त्यामुळे त्यांचे वैचारिक, धार्मिक, सामाजिक परिवर्तनाचा लढा समजून घ्यायला व विचार स्वीकारायला प्रचंड जड जातात.

मग अशी लोकं वैदिक ब्राह्मणी कळपातील केवळ एक पशू बणून पशुतुल्य जगतांना, त्यातच धन्यता मानतांना आपण पाहतो.

तामिळनाडूच्या विवेकपूर्ण वैचारिक तथा ऐतिहासिक परिवर्तनाच्या जडणघडणीच्या इतिहासात पेरियार रामास्वामी नायकर यांची भूमिका अतिशय महत्त्वपूर्ण राहिलेली आहे. त्यांनी आयुष्यभर केवळ विवेकाची कास धरली. ते नास्तिक होते आणि उपेक्षित वर्गाचे तारणहार देखील होते. मात्र त्यांची राजकीय व सामाजिक वाटचाल अनंत खाचखळग्यांनी भरलेली होती.

अंधश्रद्धा, भेदभाव, जातीय उच्च निचता, देवदैववादाचा विरोध, ब्राह्मणी वर्चस्ववादास विरोध, मद्यविक्री बंदी, अस्पृश्यता निवारण, ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर असा भेदभाव करण्यास विरोध, बालविवाह प्रथा, विधवा महिला पुनर्विवाह, साथीदार निवडीचा आणि सोडण्याचा महिलांना मुभा, महिला शिक्षणसाठी पुढाकार. लग्न सोहळ्यातील निर्थक रूढी बंदी. लग्न झालेल्या महिलांना मंगळसूत्र परिधान करण्याची सक्ती न करणे आदी बाबींसाठी त्यांनी आजिवन लढा दिला.

विशेष म्हणजे महिलांच्या हक्कासाठी आयोजित परिषदेतच त्यांना पेरियार (महान किंवा महापुरुष) ही बिरुदावली मिळाली. तामिळनाडूच्या सामाजिक, राजकीय परिस्थितीवर, नागरिकांवर पेरियार यांच्या विचाराचा खोलवर परिणाम झालेला आहे. त्यामुळे तामिळनाडूतील कोणताही राजकीय पक्ष व संघटना उघडपणे पेरियारांवर टीका करू शकत नाही. पेरियार यांनीच द्रविड चळवळ सुरू केलेली होती हे देखील विसरता येत नाही. द्रमुक, एआयएडीएमके आणि एमडीएमके हे राजकीय पक्ष या चळवळीची उत्पादने आहेत.

ब्राह्मणांनी त्यांच्या जात, वर्ण, देव, धर्म, विधी, कर्मकांड यांचा माध्यमातून इतर सर्व जातींवर वर्चस्व गाजवलेले आहे. विषमतेने वागवत राहिलेले आहेत. सामाजिक, आर्थिक, धार्मिक पिळवणूक चालवलेली आहे. प्रसंगी या वर्चस्वातून बाहेर पडण्यासाठी धर्म परिवर्तन करण्यासही हरकत नाही. या विचारातूनच दक्षिणेकडील राज्यातील तत्कालीन अनेक लोक धर्मपरिवर्तन करून ख्रिश्चन व मुस्लिम झालेली आहेत. खालच्या ब्राह्मणेत्तर हिंदू जातींना ब्राह्मणांच्या अत्याचारापासून व वर्चस्वापासून वाचवण्यासाठी धर्म परिवर्तन हाच तोडगा योग्य असे पेरियार यांना वाटत होते. आज जे दक्षिणेकडील राज्यातील ख्रिश्चन, मुस्लिम हे मुळचे आपलेच बहुजन बांधव आहेत.

एका धार्मिक हिंदू धनगर कुटुंबात जन्म होऊनही त्यांनी ब्राह्मणी सनातनी वैदिक धर्माचा ब्राह्मणेत्तर हिंदुंच्या जीवन प्रणालीत शिरकाव करून त्या ब्राह्मणेत्तरांवर लादलेल्या वैदिक सनातनी धर्म व देव यांच्यावरील रामस्वामी पेरियारांचा तो हल्ला होता. आयुष्यभर त्यांनी ब्राह्मणांच्या सनातनी वैदिक धर्माला विरोध केलेला होता. त्यांनी ब्राह्मणी सनातनी वैदिक धर्मातील वाईट गोष्टींवर इतके उघडपणे आपले मत व्यक्त केले की ब्राह्मणांनी रामस्वामी पेरियारांची टिका जणू हिंदूंच्या देव, धर्म व श्रद्धेवरचे आक्रमण ठरवले.

आजही ब्राह्मण व ब्राह्मणेतरांचा धर्म हा एक नाही. धनगरांसकट ब्राह्मणेतरांनी जोपासलेली प्राचीन धर्मविरहीत जीवन परंपरा हीच आजची हिंदू प्रणाली व हिंदू धर्म होय. तत्कालीन ब्राह्मणेतर समाजात सर्व सामाजिक व धार्मिक सोहळे हे ब्राह्मणाशिवाय होत असे. आता अलिकडे आपण किती धार्मिक आहोत ही उघडपणे दाखवण्याची स्पर्धाच ब्राह्मणेतरांच्या घरात घुसून ब्राह्मणास देवाऱ्यापर्यंत घेऊन जाण्यास कारणीभूत ठरली. ब्राह्मण हे हिंदू नाहीत. ब्राह्मणांनी ब्राह्मणेतर हिंदूंच्या जीवन प्रणालीत जाणीवपूर्वक घुसून त्यांच्यावर त्यांनी आपला धर्म लादला. ज्यातून देव - धर्म, पाप - पुण्य, स्वर्ग - नरक यांची भिती दाखवत त्यांनी त्यांच्या रोजी - रोटीची व सर्वांगीण वर्चस्वाची आजीवन सोय केली. ब्राह्मणांचा धर्म हा सनातनी वैदिक धर्म होय.

त्यांनी हजारो वर्षे स्वतःस कधीच हिंदू म्हणवले नाही. आपणच अल्पसंख्याक ठरू नये यासाठी ब्रिटिश राजवटीत हिंदूसभेची स्थापना करून ब्राह्मण हे ब्राह्मणेतरांना हिंदुत्वाची नशा पाजून सर्वांगीण स्ववर्चस्वासाठी ब्राह्मणेत्तर हिंदूचा वापर करता यावा केवळ एवढ्या करिताच वैदिक ब्राह्मण स्वतःस हिंदू म्हणवून घेऊ लागलेत हे मी माझ्या म हिंदू, हिंदुत्व, हिंदूराष्ट्र: एक मिमांसाफ या पुस्तकात विस्तृतपणे मांडलेले आहे. आजही ब्राह्मण हे स्वतःस हिंदू म्हणवून घेतात परंतु ते जोपासना मात्र सनातनी ब्राह्मणी वैदिक धर्माचीच करतात. कारण हिंदूच्या नावावर धर्माची अफूची गोळी ब्राह्मणेत्तरांना चाखवत सर्व क्षेत्रात ब्राह्मणी वर्चस्व अबाधित ठेवण्यासाठीची अहोरात्र चाललेली ही त्यांची धडपड आहे. वर्तमानात स्वःतास पुरोगामी, विचारवंत म्हणवून घेणाऱ्या भल्याभल्यांना हे ब्राह्मणी षडयंत्र ओळखता आलेले नाही. त्यामुळेच ते ब्राह्मणेतरांचा स्वतंत्र जीवनप्रणाली जोपासत असलेला हिंदू धर्म त्यांना मांडता आलेला नाही. वर्तमानातील वैदिकांच्या थोतांड देव व धर्मावर केलेली टिका वा चिकित्सा ही ब्राह्मणेतरांना ब्राह्मणांसकट स्वतःवरची वाटू लागते हेच दुर्दैव. त्यांना ना आपली संस्कृती कळली ना देव धर्म कळला. त्यांच्या हिताची व कल्याणाची लढाई लढणारे महापुरुष कधी कळणार हाच खरा यक्ष प्रश्न आहे.

**होमेश भुजाडे,** नागपूर

(पान १ वरुन)

मान्यवरांचे स्वागत जाम्यातिम्या विद्यालय गोरेगांव येथील शालेय विद्यार्थ्यांनी स्वागत गीताने केले. त्यानंतर मान्यवरांनी विविध शासकीय विभागांच्यास्टॉलचे उद्घाटन केले. कार्यक्रमादरम्यान राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाचे गीत लावण्यात आले. कार्यक्रमाचा शुभारंभ व्यासपिठावरील उपस्थित मान्यवरांनी रोपट्यांना जल देवून केला. कार्यक्रमामध्ये शालेय विद्यार्थ्यांनी स्वागत गीत गायले व सांस्कृतिक नृत्य केले. न्यायमूर्तींचा व इतर मान्यवरांचा सत्कार न्यायीक अधिकारी व वकील संघाच्या पदाधिकाऱ्यांनी केला.


प्रास्ताविक भाषणात प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष अरविंद वानखेडे यांनी विधी सेवा व शासकीय महाशिबीर आयोजनामागील उद्देश उपस्थितांना सांगितला व विधी सेवा प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती दिली. तसेच त्यांनी न्याय सर्वांसाठीफ हे विधी सेवा प्राधिकरणाचे घोषवाक्य आहे असे सांगितले. राष्ट्रीय स्तरापासुन ते तालुका स्तरापर्यंत विधी सेवा प्राधिकरण समितीची स्थापना करण्यात आली आहे असे सांगून समाजातील कोणतीही व्यक्ती किंवा घटक न्यायापासुन वंचित राहु नये हा भारतीय संविधानाचा मुळ उद्देश आहे असे सांगीतले.

जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी त्यांच्या भाषणामध्ये नागरीकांनी महामेळाव्यातील विविध शासकीय योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. न्यायमूर्ती महेंद्र चांदवाणी यांनी उपस्थितांना सामाजिक न्याय योजना, कृषी योजना, बचत गट योजना इत्यादी शासकीय योजनांचा लाभ घेवून स्वतःचा विकास करून घ्यावा, जीवनमान सुधारावे व मुख्य प्रवाहात यावे असे आवाहन केले. न्यायमूर्ती नितीन सांबरे यांनी शासनाच्या विविध योजनांबाबत नागरीकांना माहिती दिली. तसेच त्यांनी दिव्यांग जोडप्यांना प्रत्येकी ५० हजार रुपयाचे धनादेशाद्वारे अर्थसहाय्य देऊन सत्कार केला. तसेच त्यांनी गोंदिया जिल्ह्यात आढळणाऱ्या सारस पक्षांचे संरक्षण करण्यासंबंधी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.न्यायमुर्ती नितीन जामदार यांचे हस्ते दोन दिव्यांग लाभार्थ्यांना गॅझेटचे वाटप आणि तीन दिव्यांग लाभार्थ्यांना यु.डि.आय.डी. (णऊखऊ) कार्ड तसेच दिव्यांग लाभार्थ्यांना प्रमाणपत्र आणि शालेय अंध विद्यार्थ्यांना Doz Mobile चे वितरण केले.

# देवदर्शन की आणखी काही?

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारताचे सरन्यायाधीश डी.वाय.चंद्रचूड यांच्या घरी गणपतीचे दर्शन घेण्यासाठी भेट देऊन पूजाअर्चना केली. या भेटीमुळे वादळ उठले असून अनेकांनी या भेटीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलेले आहे. कारण प्रधानमंत्री आणि सरन्यायाधीश या दोन्हीही अत्यंत महत्त्वाच्या पदावर विराजमान असलेल्या व्यक्ती आहेत. त्याचबरोबर न्यायपालिका आणि कार्यपालिका या दोन स्वतंत्र संस्था आहे. या दोन संस्थांमध्ये अनेकदा आपल्याला संघर्ष पाहायला मिळतो. कार्यपालिकेचे अनेक खटले सध्या न्यायपालिकेत सुरू आहे.अशा वेळी ज्यांच्याकडे खटले सुरु आहे त्या सरन्यायाधीशाच्या घरी प्रधानमंत्र्यांनी स्वतःहून जाऊन गणपतीची पूजा करणे कितपत योग्य आहे असा प्रश्न विचारला जात आहे. सार्वजनिक कार्यक्रमात या दोन्हीही महत्त्वपूर्ण व्यक्ती एकमेकांना भेटू शकतात, बोलू शकतात. परंतु एकमेकांच्या घरी जाणे, भेट घेणे ही गोष्ट मात्र न्यायसंगत नसून न्यायालयाशी संबंधित व्यक्तीच्या बाबतीत तरी पथ्य पाळले जाणे गरजेचे असते. त्यामुळेच लोकांचा आक्षेप आहे कारण या दोन्ही केवळ व्यक्ती नसून स्वतंत्र अशा संस्था सुद्धा आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे सरन्यायाधीशाच्या घरी जाणे हे फक्त न्यायमूर्ती चंद्रचूड यांच्या घरी जाणे नसून ते देशाच्या सर्वोच्च न्यायालयाच्या प्रमुखाच्या घरी जाणे होय.त्यामुळे या भेटीवर लोकांच्या प्रतिक्रिया तीव्र आहेत.

तसेच ही भेट जर खरोखर गणपती दर्शनासाठी खाजगी होती तर प्रधानमंत्री यांनी स्वतः या भेटीचा व्हिडिओ आपल्या अकाउंटवर का शेअर केला असावा हे सुद्धा विचार करण्यासारखे आहे. खाजगी भेटीला सार्वत्रिक करण्यामागे हेतू काय? या भेटीतून आपले काही इप्सित साध्य करण्यासाठी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे सरन्यायाधीशावर दबाव निर्माण करण्याची तर खेळी नाही ना असेही प्रश्न लोकांच्या मनात उपस्थित झाले आहेत. कदाचित



असे नसेलही परंतु ज्या संस्था तटस्थपणे काम करण्यासाठी निर्माण झालेल्या आहे; अशा संस्थेच्या प्रमुखाला एकटे, एकांतात जाऊन भेटणे हे त्या संस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यासाठी लोकांना आयती संधी उपलब्ध करून देण्यासारखे आहे. कदाचित यामध्ये प्रधानमंत्री यांचा कोणता स्वार्थ नसेलही परंतु विनाकारण लोकांमध्ये या भेटीबद्दल कुजबूज सुरू झाली आहे आणि सरन्यायाधीश व सर्वोच्च न्यायालयाच्या निप:क्षपाती कामाबद्दल शंका आणि संशय निर्माण होत आहे. त्यामुळे एका सर्वोच्च संस्थेची पत आणि विश्वास कमी होण्यास ही भेट कारणीभूत ठरू शकते.नरेंद्र मोदी यांनी या गोष्टीचा गांभीर्याने विचार करणे आवश्यक होते.

प्रधानमंत्री आणि सरन्यायाधीश या दोघांनाही धार्मिक स्वातंत्र्य आहे.ते आपल्या घरी धार्मिक सण,उत्सव साजरे करू शकतात. भारतीय राज्यघटनेने सर्वांना धार्मिक स्वातंत्र्य बहाल केलेले आहे. परंतु त्या धार्मिक स्वातंत्र्याचा गैरवापर सुद्धा होणार नाही याची काळजी सर्वोच्च पदांवरील व्यक्तींनी घेणे फार आवश्यक असते. सरकारच्या विरोधातील अनेक खटले सर्वोच्च न्यायालयात सुरू असताना आणि सरन्यायाधीशांच्या निवृत्तीला दोन महिनेच बाकी असताना प्रधानमंत्री अचानक त्यांच्या घरी दर्शनाला जाणे हे कुठेतरी शंका निर्माण होण्यास संधी देणारे आहे. अप्रत्यक्षपणे हा न्यायपालिकेवर दबाव निर्माण करण्याचा तर प्रयोग नसेल ना? मागेही एकदा प्रधानमंत्री यांनी सहज सर्वोच्च न्यायालयात फेरफटका मारला आणि तेव्हाचे सरन्यायाधीश गोगोई यांच्यासोबत त्यांच्या केबिनमध्ये गुप्त चर्चा केली होती. गोगोई निवृत्त झाल्यानंतर लगेच त्यांना राज्यसभेवर खासदार म्हणून नियुक्त केले गेले.

त्यामुळे लोकांना संशय येण्यास बराचसा वाव आहे. प्रधानमंत्री यांनी अशी भेट टाळायला पाहिजे होती असे लोकांचे मत आहे.या भेटीमुळे चंद्रचूड यांच्यावर दबाव येईल किंवा त्यांच्या विचारात लगेच परिवर्तन होईल असेही नाही. परंतु संस्थात्मक दृष्टीने विचार करता सर्वोच्च न्यायालयासारख्या तटस्थ व सर्वोच्च संस्थेवर विनाकारण शंकेचे ढग निर्माण होत आहे ही आपल्या देशाच्या न्याय व्यवस्थेसाठी चांगली गोष्ट नाही. अशा भेटींचा इव्हेंट होत असेल तर स्वायत्त संस्थांची विश्वासार्हता कमी होते. आपल्या प्रधानमंत्र्यांना कोणत्याही गोष्टीचा इव्हेंट करण्याची सवय आणि आवड आहे.अशा गोष्टींचा फायदा घेण्यातही ते वाकबगार आहे. त्यामुळे त्यांनी लगेच या दर्शनाचा व्हिडिओ सर्वत्र व्हायरल करून सरन्यायाधीशावर सुद्धा विनाकारण संशय निर्माण केलेला आहे व त्यांच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचवलेला आहे. अशावेळी वैयक्तिक फायदा किंवा प्रतिष्ठेपेक्षा संस्थात्मक बाबींचा देशहिताच्या दृष्टीने विचार करणे फार आवश्यक असते.परंतु आपल्या देशातील कोणत्याही पक्षाचे राजकारणी लोक असो, ते प्रत्येक गोष्टीत राजकीय फायदा शोधण्याचा प्रयत्न करीत असल्यामुळे आपल्या स्वायत्त व तटस्थ संस्थेवरील लोकांचा विश्वास दिवसेंदिवस कमी होत चाललेला आहे. याकरीता राजकारणी लोकांबरोबर आम्ही सर्वसामान्य जनता सुद्धा दोषी आहोत.

**प्रेमकुमार बोके,** अंजनगाव सुर्जी

# रोहयो कामावर मजूर कमी अन् हजेरी जास्त

## सामाजिक वनीकरण विभागाची वृक्ष लागवड, बोनस मजुरांच्या नोंदीचा संशय

**सडक अर्जुनी:** सामाजिक वनीकरण विभाग कोहमारा सडक अर्जुनी अंतर्गत, धानोली ते मालीजुंगा रोड व धानोली ते लेंडेझरी रस्त्यावरील दोन्ही बाजूला ऑगस्ट महिन्यात वृक्ष लागवड करण्यात आली. ५ दिवसांत २२०० वृक्ष लावण्यात आले. मजुरांकडून काही खड्डे खोदण्यात आले, तर उर्वरित खड्डे न खोदता वृक्ष लागवड करण्यात आली. वृक्ष लागवडीचे काम बोगस असून, कामात अनियमितता दिसत असून, डुंबरावर वृक्ष लागवड करण्यात आली आहे. तसेच कामावर बोगस हजेरी लावून हजेरी जास्त व मजूर कमी खड्डे व खोदणारे व्यक्ती कामावर दाखवून बोगस काम करण्यात आले. या कामांची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शहनिशा करुन निष्पक्ष चौकशी करुन दोषी कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी धानोरी येथील कामावर असलेल्या मजुरांनी केली आहे.

साामाजिक वनीकरण विभाग कोहमारा/सडक अजुरनी अंतर्गत, धानोली ते मालीजुंगा रोड व धानोरी ते लेंडेझरी रस्त्याच्या दोन्ही बाजूला वृक्ष लागवड करण्यासाठी खड्डे खोदण्याच्या कामाची सुरुवात २० जूनला करण्यात आली. ३ ऑगस्टपर्यंत खड्डे खोदकाम धानोरी येथील मजूरांच्या सहाय्याने करण्यात आले. या रस्त्याच्या दोन्ही बाजूला १३०० खड्डे खोदण्यात आले. उर्वरित ७०० खड्डे न खोदता वृक्ष लागवड करण्यात आली. खड्डे खोदणाऱ्या मजूरांना मध्येच कामावरुन बंद करण्यात आले.

या कामावर धानोरी येथील अमरसेन पटले, रामदास नारनवरे, कमलेश बिसेन, गुरुदास बिसेन, देवराम पेंदाम, पोमेश्वर मेश्राम, मंगेश मळकाम, रामदास मेश्राम, देवेश मेश्राम, शिवसागर रहांगडाले, गौरीशंकर कळंबे, हर्षवर्धन मरस्कोल्हे, तिमा मेश्राम, रामलाल भोंडे, जयलाल मरस्कोल्हे, भोजेंद्र मडावी, छगनलाल वरखडे, विजय वट्टी, कृष्णकुमार टेंभरे या मजूरांच्या हातून खड्डे खोदून या मजूरांना मध्येच बंद करण्यात आले.

५ ऑगस्टपासून वृक्ष लागवड काम सुरु करुन ९ ऑगस्टपर्यंत फक्त ५ दिवसात २२०० वृक्ष लावण्यात आले. मालीजुंगा रोडवर खड्डे न खोदता ३५० वृक्ष लागवड करण्यात आली. तर लेंडेझरी मार्गावर ३५० वृक्ष लागवड करण्यात आले. काम वनरक्षक अभय बडोले व बारमाही वनमजूर सुनील भिमटे यांच्या देखरेखीत व सांगण्यानुसार करण्यात आले. लावलेले झाडे (वृक्ष) उपटून डबल लाईनमध्ये लावण्यात आले. ती झाडे मेली. कामावरील मजुरांचे मस्टर निघाले नाही. म्हणून बिना हजेरीने काम करा, असे वनरक्षक व बारमाही वनमजूर यांनी मजूरांना सांगितले. तर मजूर कामावर असुनसृद्धा मस्टर वरुन नावे कमी केली आहेत.

कामावरील मजूरांना वनरक्षक व बारमाही वनमजूर त्रास देत होते. या कामावर मुंडीपार येथील दोन मजुरांना कामावर घेतले होते. मुंडीपार येथील सुकचंद मेश्राम व आदिल मेश्राम हे मजूर बारमाही वनमजूराचे सासरे व साळे होते. ते फक्त हजेरी पुरते काम म्हणजे ३-४ तास थांबणे व घरी निघून जाणे असे काम होते. सर्व काम बोगस असून कामात अनियमितता आहे. बिना खड्ड्याने लावलेल्या झाडांना डुंबर बनविण्यात आले आहे.

धानोरी येथील मजुरांना वनरक्षक व बारमाही वनमजूर यांनी ३० झाडांसाठीचे कुंपण एका मजूराकडून झाले, तर ठिक नाही तर कामावरुन बंद व्हा. आम्ही दुसरे गावावरुन मजूर आणू अशी धमकी देत होते. तसेच बिना हजेरी व बिना मस्टरने वृक्षलागवड केल्यानंतर ८ दिवस कुंपण लावण्याचे काम केले. धानोरी येथील मजुरांना बंद करुन फक्त ५ मजूर कामावर ठेवले. या कामात वनरक्षक व बारमाही वनमजूर यांनी झाडे लावा, झाडे जगवा उपक्रमांतर्गत बोगस काम करुन वृक्ष लागवड केली. या कामाची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शहनिशा व चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याची मागणी कामावरील मजुरांनी केली आहे.



### ४० वृक्ष लावण्याचे आदेश

**कामावर ८ मजुरांनी खड्डे खोदण्याचे व वृक्ष लागवड करण्याचे काम केले. वनरक्षक व बारमाही वनमजूर यांनी काम अनाधिकृतरित्या केले आहे. अर्धवट खड्डे खोदून झाडे लावली आहेत. तसेच डुंबरावर खड्डे न खोदता झाले लावले. मजुरांना २९७ रुपये मजूरी आता मिळेल व नंतर १८७ रुपये मजुरी देण्यात येईल, असे वनरक्षक यांनी सांगितले. बारमाही वनमजूर यांनी एका मजुराने ४० झाडे लावून ४० डुंबर करायचे असे सांगितले. पण एक मजूर फक्त २० झाडे लावण्यात यशस्वी झाला. त्याला बंद करण्यात आले.**

**४० झाडे व ४० डुंबर एक मजूर करु शकणार नाही. कारण माती ठणक होती.या कामावर आम्हा मजुरांना वनरक्षक व बारमाही वनमजूर त्रास देत होते. काम करायचे करा, नाही तर कामावरुन बंद व्हा, अशी धमकी देत होते. काम बिना हजेरी व बिना मस्टरने करण्यात आले असून काम अनधिकृत आहे. या कामाची वरिष्ठ अधिकारी यांनी शहनिशा व चौकशी करुन दोषींवर कारवाई करावी.**

**अमरसेन पटले, कामावरील मजूर**

# अतिवृष्टीने चार हजार हेक्टरमधील पिकांचे नुकसान

## कृषी विभागाचे प्राथमिक सर्वेक्षण, पूर ओसरला, जनजीवन पूर्वपदावर

**गोंदिया:** जिल्ह्यात सोमवारी आणि मंगळवारी झालेल्या अतिवृष्टीमुळे पूर परिस्थिती निर्माण होऊन शेकडो हेक्टरमधील पिके पाण्याखाली आली होती. परिणामी मोठ्या प्रमाणात नुकसन होण्याचा अंदाज वर्तविला जात होता. कृषी विभागाच्या यंत्रणेने केलेल्या प्राथमिक सर्वेक्षणात जिल्ह्यातील ४ हजार हेक्टरमधील पिकांचे नुकसान झाल्याचे पुढे आले असून या नुकसानीत पुन्हा वाढ होण्याचा अंदाज कृषी विभागाने वर्तविला आहे.

अतिवृष्टीमुळे गोंदिया, तिरोडा, सालेकसा, आमगाव, देवरी व सडक अर्जुनी तालुक्यात पूर परिस्थिती निर्माण झाली होती. बुधवारपासून पावसाने विश्रांती घेतल्याने पूरबाधित गावात मदत कार्याला प्रशासनाने सुरुवात केली होती. वैनगंगा आणि बाघ नदीच्या पाणी पातळीत वाढ झाल्याने तिरोडा आणि गोंदिया तालुक्यात बुधवारी पूर परिस्थिती कायम होती. मात्र गुरुवारी (दि.१२) या दोन्ही तालुक्यातील पूर ओसरल्याने जनजीवन पूर्वपदावर आले. मात्र अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात घरांची पडझड झाली असून पिकांचेसुद्धा नुकसान झाले आहे. पूर आणि अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे सर्वेक्षण कृषी व महसूल विभागाच्या यंत्रणेच्या माध्यमातून जिल्ह्यात सुरु आहे.

कृषी विभागाने केलेल्या प्राथमिक सर्वेक्षणात ४ हजार हेक्टरमधील पिकांचे नुकसान झाल्याचे पुढे आले आहे. मात्र या आकड्यात पुन्हा वाढ होण्याची शक्यता कृषी विभागने वर्तविली आहे. पिकांचे सर्वाधिक नुकसान गोंदिया, तिरोडा, सालेकसा, आमगाव, देवरी या तालुक्यात झाल्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी अभिजीत आडसुळे यांनी सांगितले.



### पुराने घेतला पाच जणांचा बळी

**संततधार पावसामुळे पूर परिस्थिती निर्माण झाल्याने नाल्यात वाहून गेल्याने जिल्ह्यात ठिकठिकाणी पाच जणांचा मृत्यू झाला आहे. याची नोंद जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभाग व पोलिस प्रशासनाने घेतली आहे.**

### पंचनामे युद्धपातळीवर करा

**अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे झालेल्या नुकसानीचे सर्वेक्षण युद्ध पातळीवर करुन नुकसानग्रस्तांना त्वरित नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी लोकप्रतिनिधी व नुकसानग्रस्तांकडून केली जात आहे.**

### १६१७ घरांची झाली पडझड

**जिल्ह्यात दोन दिवस झालेल्या संततधार पावसामुळे १६१७ घरे व ४४९ गोठ्यांची पडझड झाली आहे. पाऊस थांबताच नुकसानीचे पंचनामे करण्यात सुरुवात झाली आहे. घरांची मोठ्या प्रमाणात पडझड झाल्याने अनेक कुटूंबावर उघड्यावर राहण्याची वेळ आली आहे. ज्यांच्या घरांची पूर्णत: पडझड झाली आहे त्यांना त्वरित मदत देण्यासाठी प्रयत्न केले जात आहे.**

# न्याय प्रविष्ट प्रकरण निकाली काढण्यासाठी राज्य सरकार विरोधात आता जनहित याचिका

- नगर परिषद संघर्ष समितीने घेतली भूमिका
- आठ वर्षात राज्य सरकारला यश नाही.
- विधानसभा निवडणुकीत निर्णायक भूमिका घेणार

**गोंदिया:** जिल्ह्यातील नगर परिषद आमगाव चे आठ वर्षापासून प्रलंबीत न्याय प्रविष्ट प्रकरण राज्य शासनाने निकाली काढले नाही ,संघर्ष समितीने राज्य सरकारला अनेक निवेदने दिले, आंदोलने केली परंतु निकाल लागला नाही. आता संघर्ष समितीने न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यासाठी पावले उचलली आहे.

गोंदिया जिल्ह्यातील आमगाव नगर परिषदचे प्रलंबीत न्याय प्रविष्ट प्रकरण राज्य शासनाने निकाली काढण्यासाठी योग्य भूमिका घेतली नाही. त्यामुळे मागील आठ वर्षापासून नागरिकांच्या विकासकामांना खीळ बसली आहे. सदर प्रकरण निकाली काढण्यासाठी राज्य सरकारला आठ वर्ष लोटूनही यश मिळाले नाही.




सदर न्यायप्रविष्ठ प्रकरण शासनाने निकाली काढावे यासाठी नगर परिषद संघर्ष समितीने अनेक आंदोलने उपोषणे केली. मागील लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर संघर्ष समितीने आठ गावात निवडणूक मतदानावर बहिष्कार टाकला होता. यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १४ एप्रिल २०२४ ला आमगाव येथे बाबासाहेबांना अभिवादन करून निवडणूक सभेत व नगर परिषद संघर्ष समिती प्रतिनिर्धीना आस्वस्त करून प्रकरण निकाली काढण्यात येईल असे आश्वासन दिले होते.परंतु निवडणूक संपून अवघे चार महिने लोटूनही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेले शब्द पाळले नाही. त्यामुळे न्यायालयात प्रलंबीत प्रकरण अद्यापहीङ्ग जैसे थे; अश्या अवस्थेत आहे. आता नगर परिषद संघर्ष समितीने नागरिकांच्या या प्रश्नांना सामोरे होऊन राज्य सरकार विरोधात न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यासाठी पावले उचलली आहे. याच महिन्यात या याचिकेवर सुनावणी व्हावी यासाठी नियोजित दखल घेण्यासाठी कायदे सल्लागार यांची मदत घेतली जात आहे.अशी माहिती नगर परिषद संघर्ष समितीने दिले आहे.

### संघर्ष समिती घेणार विधानसभा निवडणुकीत वेगळी भूमिका

**मागील आठ वर्षापासून राज्यसरकारने न्यायालयात आव्हान देत प्रकरण न्यायप्रविष्ठ ठेवले आहे. याचा मोठा भुर्दंड नागरिकांना सोसावा लागत आहे. योजना असून त्याचा लाभ मिळत नाही. यामुळे नागरिक हताश झाले आहे.अश्या परिस्थितीत नगर परिषद संघर्ष समिती नागरिकांसाठी वेगळी भूमिका घेणार असल्याची माहिती दिली आहे. नागरिकांच्या विकासकामांना खीळ बसऊन राज्य सरकार काय साध्य करीत आहे असा सवालही संघर्ष समितीने केला आहे.**

# बसच्या मागणीसाठी विद्यार्थिनींची जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक

**सालेकसा :** सालेकसा-आमगाव राज्य महामार्गावर बससेवा बंद झाल्यामुळे शाळा महाविद्यालयांत जाणाऱ्या विद्यार्थिनींची अडचण झाली आहे. तर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यामुळे विद्यार्थिनींनी बुधवारी (दि.११) गोंदिया जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देऊन पर्यायी व्यवस्था म्हणून कुलपा मार्गे बससेवा सुरू करण्याची मागणी केली.

आमगाव-सालेकसा राज्य महामार्गावरील वाघ नदीवरील पुलाच्या जीर्ण अवस्थेमुळे जड वाहनांना पुलावर प्रवेश बंद करण्यात आला आहे. अवजड वाहनांची वाहतूक थांबविण्यासाठी पुलावर सुमारे ८ फूट उंच बॅरिकेड्स लावण्यात आले आहेत. पुलाच्या दोन्ही बाजूंनी आमगाव सालेकसा मार्गावरील राज्य परिवहन महामंडळाची बससेवा बंद केली आहे.

त्यामुळे रोंढा, पानगाव, मुंडीपार, गोवारीटोला कावरबांध, झालिया परिसरातून सामान्यतः राज्य परिवहन बसने प्रवास करणा?्या शेकडो विद्यार्थी, महिला व प्रवाशांना आमगाव व सालेकसाकडे जाणाऱ्या बससेवेपासून वंचित राहावे लागत आहे. बसमध्ये मिळणाऱ्या अर्ध्या तिकिटाच्या सुविधेपासून वंचित राहावे लागत आहे. तर विद्यार्थिनींना सालेकसा-तिरखेडी-सातगाव-साखरीटोला या मार्गावरून जाण्यासाठी प्रवाशांना १६ किमीचा प्रवास करावा फेरा मारून जावे लागत आहे. तर बससेवा बंद असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यामुळे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी सालेकसा साखरीटोला-कुलपा-आमगाव या मार्गावर बस तातडीने सुरू करण्याची मागणी आगारप्रमुखांनीसुद्धा जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.



### दोन दिवसांत बससेवा सुरू न केल्यास तीव्र आंदोलन

**आ. कुरहि यांनी बालघाट जिल्हाधिकाऱ्यांशी बोलून गोंदिया जिल्हाधिकाऱ्यांशी बोलण्यास सांगितले आहे; परंतु अजून आदेश देण्यात आले नाहीत. अखेर त्रस्त झालेल्या विद्यार्थ्यांनी जि.प. सदस्य छाया नागपुरे यांच्यासोबत जिल्हाधिकारी प्रजित नायर यांना निवेदन देऊन दोन दिवसांत सालेकसा-सा- खरीटोला-कुलपा-आमगाव मार्गावरून बस सुरू न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा दिला. यावेळी विद्यार्थिनी उपस्थित होत्या.**

### लोकप्रतिनिधींनी केला पाठपुरावा

**सालेकसा-साखरीटोला-कुलपा या मार्गावर बस सुरू करण्यासंदर्भात माजी आ. भेरसिंह नागपुरे यांनी मध्य प्रदेश राज्याला आमगाव मार्गावरून बस चालविण्यास परवानगी देण्याचे पत्र दिले आहे. पं.स.सदस्या अर्चना मडावी यांनी लांजीचे आ. राजकुमार कुरहि यांना प्रत्यक्ष भेटून समस्या लक्षात आणून दिली. जि.प. सदस्या छाया नागपुरे यांनीसुद्धा फ्फोन लावून बससेवा सुरू करण्याची मागणी केली आहे.**

# विधी सेवा व शासकीय योजना महामेळाव्यात आरोग्य विभागाची जनजागृती




**गोंदियाः-** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण सर्वोच्च न्यायालय नवी दिल्ली व महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरण उच्च न्यायालय मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,जिल्हा न्यायालय व जिल्हा प्रशासन यांचे संयुक्त विद्यमाने शनिवारी दि.१४ सप्टेंबर रोजी पोवार सांस्कृतिक भवन कन्हारटोली येथे विधी सेवा महाशिबिर व शासकीय योजनांचा महामेळावा आयोजित करण्यात आला होता.

मेळाव्याचे उद्घाटन उच्च न्यायालय मुंबईचे वरिष्ठ न्यायमूर्ती नितीन जामदार यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी न्यायमूर्ती नितीन सांबरे वरिष्ठ न्यायमूर्ती नागपूर खंडपीठ उच्च न्यायालय मुंबई, न्यायमूर्ती महेंद्र चांदवाणी नागपूर खंडपीठ उच्च न्यायालय मुंबई व पालक न्यायमूर्ती न्यायीक जिल्हा गोंदिया, सदस्य सचिव महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरण मुंबई समीर अडकर, अरविंद वानखेडे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण गोंदिया, जिल्हाधिकारी प्रजीत नायर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम.मरुगानंथम, पोलीस अधीक्षक गोरख भांबरे उपस्थित होते.

विधी सेवा महाशिबिर व शासकीय योजनांच्या महामेळाव्यात ग्रामपंचायत,नगर परिषद, पोलीस, वन, महिला व बालविकास, पोष्ट,रेल्वे, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, उमेद, विविध अशासकिय संस्था, बचत गट यांनी नागरिकांसाठी विविध शासकीय योजनांची माहिती देणारे स्वतंत्र स्टॉल लावलेले होते.

जनजागृती स्टॉलच्या माध्यमातून विविध आरोग्यविषयक योजना जसे प्रधानमंत्री मातृवंदन योजना, जननी सुरक्षा कार्यक्रम, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम,प्रधानमंत्री जन आरोग्य योजना,आभा कार्ड, मानव विकास कार्यक्रम यासोबत आरोग्य विषयक विविध आजारांबाबत प्रतिबंधात्मक उपचार यांचे सुद्धा प्रचार व प्रसिद्धी करण्यात आली.महामेळाव्यात आयुष ,योगा, मानसिक आजार, सिकलसेल व असासंर्गिक आजारा जसे मधुमेह, रक्तदाब, हृदयविकार, किटकजन्य आजार हिवताप, डेंग्यु या आजाराबाबत जनजागृती करण्यात आल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नितीन वानखेडे यांनी या प्रसंगी माहीती दिली आहे.

विधी सेवा महाशिबिर व शासकीय योजनांच्या महामेळाव्या दरम्यान सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अरविंदकुमार वाघमारे, जिल्हा साथरोग अधिकारी डॉ.निरंजन अग्रवाल,जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.अभिजित गोल्हार, कुष्ठरोग कार्यक्रमाचे डॉ.गेडा, वैद्यकीय अधिकारी डॉ.विकास विंचुरकर, जिल्हा माध्यम विस्तार अधिकारी विजय आखाडे, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक अर्चना वानखेडे, जिल्हा आयुष अधिकारी डॉ.मीना वट्टी, असासंर्गिक कार्यक्रमाचे डॉ.स्नेहा वंजारी, डॉ.कांचन भोयर, नेत्ररोग विभागाचे भाविका बघेले, सिकलसेल विभागाचे सपना खंडाईत, राष्ट्रीय बाल सुरक्षा कार्यक्रमाचे संजय बिसेन, हिवताप विभागाचे नंदकिशोर भालेराव, आरोग्य विभागाचे प्रमोद काळे, स्वाती पाटील, आशा सेविका, आरोग्य सेविका, आरोग्य सेवक, आरोग्य पर्यवेक्षक यांची उपस्थिती होती.

### ३ बैलगाड्यांना ट्रकची धडक, २ बैल ठार, ३ चालक जखमी

गोंदिया: सडक अर्जुनी तालुक्यातील कोहमारा ते नवेगावबांध मार्गावर कनेरी गाव शिवारात सोमवारी (दि?१६) सायंकाळच्या सुमारास एका भरधाव ट्रकने एकापाठोपाठ एक तीन बैलगाड्यांना जोरदार धडक दिल्याने दोन बैल जागीच ठार झाले. तर चार बैल व तीन बैलगाडी चालक गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. भुपेंद्र दोनोडे (वय ३१), हेतराम मेंढे (वय ४१), डुडेश्वर हेमणे (वय २५) तिघेही रा.राका, ता सडक अर्जुनी असे जखमी बैलगाडी चालकाचे नाव आहे.


## ग्रामपंचायत कार्यालय कोरंभीटोला
## तालुका अर्जुनी/मार. जिल्हा गोंदिया

**निविदा सूचना क्र. १/२०२४-२५**
**(पहिली वेळ)**

ग्रा.पं. कोरंभीटोला ता.अर्जुनी/मोर. जि. गोंदिया अंतर्गत सन २०२४-२५ वर्षाकरिता १५ वा वित्त आयोग योजनेंतर्गत (निधी २०२३-२०२४). १) नाली बांधकाम-दुर्योधन नाकाडे, दयानंद निखुरे वासुदेव धुर्वे यांच्या घराजवळ २) शाळा अंगणवाडी शौचालय व मुतारी दुरूस्त करणे. ३) पिण्याच्या पाण्याची टाकी दुरूस्ती व पेटींग करणे १५ वा वित्त आयोग अंतर्गत बांधकाम हे सदर कामे करण्यासाठी ऑफ्फलाईन दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदर निविदा केवळ ऑफलाईन पद्धतीने सादर करावयाची असुन निवीदा बाबत इतर सविस्तर माहिती ग्रा.पं. कार्यालय कोरंभीटोला चे सुचना फलकावर उपलब्ध आहे.

**निविदा वेळापत्रक**

| | |
|---|---|
| १)निविदा प्रसिद्धी | १८/०९/२०२४ |
| २)निविदा ऑफलाईन | १८/०९/२०२४ ते भरणा २५/०९/२०२४ सायं ५.०० वा.पर्यंत |
| ३) निविदा उघडणे | ग्रा.पं.मासिक सभेत शक्यतो |
| ४) निविदा भरणा पूर्व बैठक | नाही |
| ५) निविदा शुल्क व अनामत रक्कम भरणा करणे | ग्रामपंचायत कोरंभीटोला खाते क्र.97790100016458 बँकेचे नाव- बँक ऑफ वडोदा अर्जुनी/मोर.बँकेचे IfSC Code क्र. BARBODBARN या खात्यावर RTGS/NEFTDirecttransfer किंवा ग्रामपंचायत कोरंभीटोला येथे रोखीने भरणा करणे |

स्वा/- ग्रामसेवक ग्रा.पं.कोरंभीटोला | स्वा/- उपसरपंच ग्रा.पं.कोरंभीटोला | स्वा/- सरपंच ग्रा.पं.कोरंभीटोला


# पूर रेषेत क्षेत्र तरीही घरे बांधण्याची परवानगी कशी?



**गोंदिया:** जिल्ह्यात गेल्या सहा दिवसांपुर्वी अतिवृष्टी होऊन गोंदिया शहरालगत असलेल्या फुलचूर येथील नाल्यालगत असेलेले एक दूमजली घर कोसळून मायलेकाचा मृत्यू झाल्याची दुदैवी घटना ९ सप्टेंबर रोजी घडली. या घटनेमुळे प्रशासनाचा गलथान कारभार उघडकीस आला. नदी, नाले व पूर रेषेच्या आत कुठल्याही प्रकारचे बांधकाम करु नये, असा नियम आहे. मात्र यानंतरही शहरातील फुलचूर परिसरात चक्क नाल्यालगत दुमजली इमारती उभारण्यात आल्या आहेत. या इमारती पूरक्षेत्र व रेडझोनमध्ये असून, या बांधकामाला परवानगी दिलीच कशी जाते, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. पूर रेषेत बांधकामांन परवानगी देणे म्हणजे मृत्यूला आमंत्रण असल्याचे फुलचूर येथे घडलेल्या घटनेवरुन स्पष्ट झाले आहे.

गेल्या पाच-सहा वर्षात गोंदिया शहराचा झपाट्याने विस्तार झाला आहे. शहरात वसाहती निर्माण करण्यासाठी जागा शिल्लक राहिलेली नाही. त्यामुळे शहरालगत असलेल्या भागात विस्तार होत आहे. लाखो रुपये किमतीचे प्लॉट आणि भूखंडाची विक्री केली जात आहे. जात काही गैर नाही, मात्र या वसाहती निर्माण होत असताना तेथील बांधकाम हे नियमानुसार होणे गरजेचे आहे. नदी, नाले यांच्या ५० फुट क्षेत्रात कुठलेही बांधकाम नको, असा नियम आहे. शिवाय, ज्या भागात पूर रेषा गेली आहे. त्या भागात बांधकामाला परवानगी देऊ नये,, अशा शासनाच्या स्पष्ट सुचना आहेत. मात्र या नियमांचे लक्ष्मीदर्शनाने सर्रासपणे उल्लघंन केले जात आहे. कधी राजकीय दबार आणून तर कधी लक्ष्मी दर्शन घडवून पूर रेषेत व रेड झोनमध्ये इमारत बांधकामांना परवानगी दिली जात आहे. यामुळे गोंदिया शहरालगत असलेल्या फुलचूरसह शहरातील काही भागांत पॉश वसाहती उभारण्यात आल्या आहे. या वसाहतीतील बरीच घरे नाल्यालगत व पूर रेषेत आहेत.

नाल्यापासून ५० फुट व पुररेषेत कुठल्याही बांधकाम परवानगी देऊ नये असा नियम आहे. मात्र यानंतरही नगररचना विभाग, नगर परिषद व संबंधित विभागाकडून इमारती बांधकामास परवानगी दिली जात असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. फुलचूर येथील नाल्यालगत दोन वर्षापुर्वी एका इमारतीचे बांधकाम करण्यात आले. ही दुमजली इमारत अतिवृष्टीमुळे कोसळून नाल्यात वाहून गेली. या दुदैवी घटनेत मायलेकाचा हकनाक बळी गेला. तर भविष्यातही अशा घटना या परिसरात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे घटनेपासून प्रशासन बोध घेणार का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

### गाढ झोपेत असलेल्या प्रशासनाचे उघडणार डोळे

**फुलचूर येथे घडलेल्या घटनेनंतर पूर रेषेत आणि रेड झोनमध्ये घरांच्या बांधकामांना प्रशासनाने मंजुरी दिलीच कशी. दोन जणांच्या मृत्यूस जवादार असणाऱ्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर मनुष्यवधाचा गुन्हा का दाखल करण्यात येऊ नये, नियमांचे उल्लघंन करुन मृत्यूचे सापडे तयार करणाऱ्या इमारती बांधकामांना परवानगी दिलीच कशी जाते. असा सवाल करीत शहरवासीयांनी प्रशासनावर तोफ डागली आहे. त्यामुळे यानंतर तरी प्रशासन यापासून कुठला धडा घेऊन कारवाई करते हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.**

### पूर रेषेतील बांधकामाचे करणार का सर्वेक्षण

**गोंदिया शहर व शहरालगत पूर रेषेत व रेडझोनमध्ये अनेक इमारतीचे बांधकाम करण्यात आले आहे. या बांधकामामुळे भविष्यात बजाज नगर येथे घडलेल्या घटनेची पुनरावृत्ती होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे असे प्रकार घडू नयेत, यासाठी प्रशासन अशा इमारतीचे सर्वेक्षण करुन कारवाई करते की, चलता है चलने दो, म्हणत याकडे दुर्लक्ष करते, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. मात्र प्रशासनाचे दुर्लक्ष दोन जीवांचा नाहक बळी घेऊन गेल्याने अशा प्रकारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.**


## कार्यालय ग्राम पंचायत चापटी
### पंचायत समिती अर्जुनी/मोरगाव, जिल्हा परिषद गोंदिया

**निविदा सुचना**
(पहिली वेळ)

सर्व इच्छुक साहित्य पुरवठा धारकास सुचित करण्यात येत आहे कि, ग्राम पंचायत चापटी ला खालील विवरण पत्राप्रमाणे साहित्याची आवश्यकता असल्याने ईच्छुक पुरवठा धारकाकडून दिनांक २४/०९/२०२४ ला दुपारी ३ वाजेपर्यंत लिफाफा पद्धतीने निविदा दरपत्रक मागविण्यात येत आहे. निविदा फार्म प्रक्रिया निविदा स्विकारण्याची प्रक्रिया दिनांक १८/०९/२०२४ ते २४/०९/२०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत राहील. निविदा बाबतचे अटी व शर्ती संबंधित ग्राम पंचायत कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळेत पहावयास मिळेल.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फार्मची किंमत | अनामत रक्कम (१%) | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | अंगणवाडी दुरुस्ती बांधकाम करणे | ८७०००/- | ५००/- | ८७०/- | ३ महिने |
| २ | घनकचरा व्यवस्थापनाकरिता कचरा कुंडी व कचरा पेटी खरेदी करणे व सोलर लाईट लावणे व स्वच्छ व हरीत गाव वर आधारित कामे घेणे | २७००००/- | ५००/- | २७००/- | ३ महिने |
| ३ | मौजा चापटी येथे शुद्धीकरण यंत्र बसविणे, पिण्याच्या व पाण्याची व्यवस्था करणे, सोलर पंप बसविणे जलसमृद्ध गाववर आधारित कामे घेणे | २७००००/- | ५००/- | २७००/- | ३ महिने |

१) सदर कामाचा तपशीलवार संपूर्ण माहिती अटी शर्तीसह ग्राम पंचायतच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केले आहे.

सरपंच ग्राम पंचायत चापटी | ग्रामसेवक ग्राम पंचायत चापटी

# भाजपची दलाली करणाऱ्या त्या स्वनामधन्य नेत्यांने या पुढे आमच्यात पडू नये:पटोले

**गोंदिया:** आमच्या गोंदिया भंडारा जिल्हयात एक नेता आहे, त्या माणसाने काँग्रेस संपवण्याचे काम कसे करता येईल हेच केले आहे. आता भाजपच्या कंपूत राहून ते पुढील विधानसभा निवडणुकीत आमच्या विरोधात अपक्ष उमेदवारांना रिंगणात उतरवून कॉंग्रेसच्या उमेदवारांना पाडण्याच काम ते करणार आहे. परंतु, आम्ही त्या नेत्याला आताच इशारा देऊन ठेवतो की गोंदिया भंडारा जिल्हयातील ७ ही विधानसभा मतदारसंघात आम्ही महाविकास आघाडीचे उमेदवारच निवडून आणणार आहे. त्या नेत्याने भांडण लावण्याचे काम बंद करावे.




गोंदिया-भंडारा जिल्ह्याला विकासाचे गाजर दाखवून या दोन्ही जिल्ह्याचा विकास खुंटवणा-या त्या नेत्याला आज या कांग्रेस पक्षाच्या मेळाव्यातून पुढे गप्प राहण्याचा इशाराच काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी अप्रत्यक्षरित्या खा. प्रफुल पटेलांचे नाव न घेता दिला आहे.

मंचावर विरोधी पक्षनेते विजय वड्डेटीवार, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, माजी मंत्री नितिन राऊत, सुनिल केदार, सतिश चतुर्वेदी, आदिवासी नेते शिवाजीराव मोघे, खासदार प्रशांत पडोळे, खासदार नामदेवराव किरसान, खासदार श्याम बर्वे, आमदार सहसराम कोरेटे, आमदार अभिजित वंजारी, माजी खासदार शिशुपाल पटले, वारासिवनीचे आमदार विवेक पटेल, परसवाडा आमदार मधु भगत, माजी आमदार हिना कावरे, काँग्रेस जिल्हाध्यक्ष दिलीप बनसोड, माजी आमदार गोपालदास अग्रवाल, माजी जि.प.अध्यक्ष एड.के.आर.शेंडे, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस अध्यक्ष कुणाल राऊत, गोंदिया प्रभारी नाना गावंडे, माजी आमदार कुणाल चौधरी यांच्यासह अनेक मान्यवर मंचावर उपस्थित होते.

गोंदिया जिल्हा हा कुण्या एका नेत्याचा नव्हता तर काँग्रेसचा व सर्वसामान्य काँग्रेस कार्यकर्त्याचा जिल्हा आहे. आता काँग्रेसपक्ष पुन्हा गोंदिया जिल्ह्यात गोपालदास अग्रवालांच्या प्रवेशाना पुन्हा बळकट झालेला आहे. त्या नेत्यामुळेच मला आणि गोपालदास अग्रवाल यांना भ्रष्ट भाजपचा प्रवास करून यावे लागले. यात आम्हा दोघांना किती राजकीय त्रास सहन करावा लागला हे दोघांना ठाउक अल्याचेही नाना म्हणाले. आमचे नेते राहुल गांधी यांनी नेहमीच आरक्षणाच्या बाजूने भूमिका घेतली आहे. मात्र, विरोधी पक्षाचे नेते चुकीचा अर्थ काढून आमच्या नेत्यांविषयी गैरसमज पसरविण्याचे काम करीत आहेत. मुळात भाजप हा पक्षच आर-क्षणाचा विरोधक आहे. आज ही ते जातीगत जनगणना करण्यास टाळाटाळ करते या वरून सामान्य नागरिकांनी आता यांच्यापासून सजग राहून संविधानाच्या रक्षणाकरिता संघटित राहून कांग्रेस पक्षाला आपला पाठिंबा दयावा असे आवाहन या प्रसंगी कांग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केले.

पटोले म्हणोले म्हणाले की महाराष्ट्रात गेल्या सहा महिन्यात पावणे दोन हजार शेतकयानी आत्महत्या केल्याचे सरकारी आकडे असून अजून आकडे मोठे असण्याची शक्यता नाकारता येत नाही.गेल्या तीन चार दिवसापासून सर्वत्र अतिवृष्टी होत असतांना पिकपंचनामे अजून सुरु झालेले नाहीत.तर पिकविमा कंपन्या या मोदींच्या मित्रांच्या असून ते सर्वसामान शेतकयाना लुबाडण्यासाठी असल्याचीही टिका केली.तसेच गोंदिया राईस सिटीच्या नावाने प्रसिध्द आहे,मात्र राईस सिटीतील राईस मिल व्यवसायच आज केंद्र व राज्यातील सरकारमुळे संकटात आल्याचेही म्हणाले.

धान उत्पादक शेतकऱ्यांच्या धानाला योग्य दर देऊन १००० रुपये क्विंटल बोनस आमची सरकार आल्यास देऊ.शेतीवर आधारीत उद्योग आणण्याचे काम आमचे सरकार करणार आहे. गावातील युवकांना गावातच रोजगार कसा मिळेल याकरीता आमची महाविकास आघाडीची सरकार काम करणार असल्याचे पटोले यांनी सांगितले. भाजपवाल्यांच्या लालीपॉपच्या आमिषाला बळी पडू नका. जे लोक छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकात भ्रष्टाचार करु शकतात अशा लोकांना सत्तेतून दूर करायचे आहे. रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यामुळे महाराष्ट्रात खड्ड्यांचे साम्राज्य दिसून येत आहेत. हे खड्डे या राज्यातील महायुती सरकारच्या भ्रष्टाचाराचे

## राज्यातील भष्ट्राचारी महायुती सरकारला उखडून फक्केकायचे आहे-रमेश चेन्निथला



**महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे पर्यवेक्षक व प्रभारी रमेश चेन्नीथला म्हणाले की, ईडी,सीबीआयच्या माध्यमातून आमचे नेते राहुल गांधीना भिती दाखवण्याचे काम केले, परंतु ते घाबरले नाहीत. संविधानाच्या रक्षणासाठी ते लढले. देशाच्या प्रधानमंत्र्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधिशांच्या घरी जाऊन न्यायालयातील निर्णयावर दबावतंत्राचा वापर करीत संविधान संपवण्याचे कटकारस्थान रचल्याचे चेन्नी-थला म्हणाले. या देशातील सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळाले पाहिजे, या देशातील बहुसंख्य आहे त्या ओबीसी समाजाची जातनिहाय जनगणना व्हावी आमच्या नेत्यांची मुख्य भूमिका आहे. प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या नेतृत्वात महाराष्ट्रात काँग्रेस क्रमांक १ चा पक्ष बनेल अशा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला. महाराष्ट्रातील काँग्रेसचे सर्वच नेते एकदिलाने काम करीत असून आमच्या नेत्यामध्ये कुठलेच मतभेत नसून राज्यातील महायुती सरकारचे घोटाळे बाहेर काढण्याचे काम करीत असल्याचे म्हणाले. महाराष्ट्रातील जनतेने काँग्रेसला लोकसभेत दिलेले यशामुळेच देशातील भाजपची सरकार स्वबळावर येऊ शकली नाही. गोपालदास अग्रवाल सारखे व्यक्तीमत्व भंडारा-गोंदिया जिल्ह्याकरीता महत्वाचे असल्याचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी सांगितले, तेव्हा अग्रवाल यांचे काँगेसबद्दलची आस्था किती महत्वाची आहे कळल्याचेही चेन्नीथला म्हणाले.राज्यातील ही सरकार आयाराम गयारामची सरकार आहे. आमचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची भंडारा-गोंदिया ही कर्मभूमी आहे. येथून मोठमोठे नेते निवडून जायचे, ते आज विचारधारा सोडून निव्वळ आपल्या भष्ट्राचाराला लपवण्याकरीता तिकडे गेल्याचीही टिका केली. तसेच पटोलेंच्या नेतृत्वात राज्यातील विधानसभेची निवडणुक मोठ्या संख्येने जिंकू अशी आशा व्यक्त केली.**

**साकोलीतील मतदारांनी नाना पटोलेंना मोठ्या मताधिक्याने निवडून द्यावे. पटोले प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष असल्याने त्यांना राज्यातील प्रत्येक भागात प्रचाराकरीता जावे लागणार आहे. त्यामुळे त्यांच्या निवडणुकीच्यावेळी काँग्रेसच्या प्रत्येक नेत्याने व कार्यकर्त्यांनी आपणच उमेदवार समजून लढाई लढायची आहे असे आवाहन काँग्रेस कार्यकर्त्यांना करीत गोपालदास अग्रवाल यांच्या काँग्रेस प्रवेशाची अधिकृत घोषणा केली.**

## गोंदिया विधानसभा मतदार संघात काँग्रेसच लढणार-गोपालदास अग्रवाल



**माजी आमदार गोपालदास अग्रवाल काँग्रेस पक्षात प्रवेश सोहळ्यात बोलतांना म्हणाले की पाच वर्षापुर्वी मी जेव्हा भाजपमध्ये प्रवेश विकासाच्या नावावर केला तेव्हा दुःख झालेल्या माझ्या सर्व काँग्रेसच्या नेत्यांसह कार्यकर्त्यांची क्षमा मागतो असे म्हणत केलेली चूक सुधारत आज पुन्हा आपल्यासोबत काँग्रेसमध्ये पुन्हा येत असल्याचे म्हणाले. विकासाच्या मुद्यावर मी रस्ता भटकलो होतो, परंतु मी आपली चूक सुधारत परत आपल्या घरी आलो आहे.**

**माझ्यापुर्वी नानाभाऊंनी काँग्रेस सोडली तेव्हा मी काँग्रेसला सांभाळलो, माझ्या गेल्यानंतर नानाभाऊंनी सांभाळली. आत्ता आम्ही दोघेही एकत्र आहोत, काँग्रेसला मजबूत करण्याकरीता एक करुन आयुष्याच्या शेवटपर्यंत मी काँग्रेसचे काम करीन अशी ग्वाही देतो. गोंदिया विधानसभेची निवडणूक काँगेसनेच लढावी अशी सर्वांची इच्छा आहे, आणि आपण मला तशी ग्वाही दिली आहे. माझ्याचुकीमुळे २०१९ च्या निवडणुकीत काँग्रेस निवडणूक हरली असली तरी २०२४ च्या निवडणूकीत मोठ्या मताधिक्यांने काँग्रेस विजयी होईल याची ग्वाही देत असल्याचे अग्रवाल म्हणाले.**

**या मंचावर उपस्थित असलेल्यापैकीच मुख्यमंत्री व मंत्री होणार असल्याने मला विकासाकरीता ते नक्कीच सहकार्य करणार आहेत. भाजपचे प्रभारी नरोत्तम मिश्रा यांनी या कार्यक्रमाला काँग्रेसच्या तेरवीचा कार्यक्रम असे संबोधले त्या मिश्रांनाच त्यांच्या मतदारसंघातील जन-तेने पराभूत करुन त्यांची तेरवीच केल्याची टिका करीत भाजपने गोंदियात गद्दारांनाच साथ दिल्याचीही टिका केली. काँग्रेसने ७५ वर्षाच्या कार्यकाळात आमच्या गोंदिया भंडारा जिल्ह्यातील नेत्यांला महाराष्ट्राचे नेतृत्व दिले यावरुन काँग्रेस खरंच आजाद असल्याचे सांगत नानाभाऊ तुम्ही समोर वाढा आम्ही तुमच्या सोबत आहोत.**

**तुमचा जन्म गोंदियाचा आहे, तुम्ही नक्कीच गोंदियाचा विकास कराल अशी अपेक्षा व्यक्त करीत महाराष्ट्राच्या मुख्य पदावर आपण बसावे अशी आशा व्यक्त केले. ज्याच्या खांद्यावर नानाभाऊ हात ठेवतो तो विजयाचाच शिल्पकार असतो असे खासदार प्रशांत पडोळे यांचे उदाहरण देत सांगितले.**

दुकान असल्याची टिका केली. गोंदिया जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासाचे स्वप्न आपण बघितले ते पुर्ण करण्याचे आश्वासन देत असल्याचे म्हणाले.

### राज्यातील जातीयवादी व दंगलखोर सरकारला हाकलून लावा-माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण

माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की राज्यातील महायुती सरकारला छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यातही कमीशन खाण्याची वेळ आली असली सरकार आपल्याला हटवयाची आहे. राज्यातील शेतकरी,शेतमजूर, विद्यार्थी महिलांचे प्रश्न देशातील नरेंद्र मोदी व राज्यातील महायुती या जातीयवादी व दंगलखोर सरकारला सोडवता आलेले नाहीत अशी टिका करीत येत्या विधानसभेच्या निवडणुकीत लोकसभेत जसा निकाल विदर्भात दिला, तसाच निकाल मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली. येत्या विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीमधील कुठला पक्ष कुठे जाईल हे नक्की नसले तरी १०० च्या आत ते राहतील असेही चव्हाण म्हणाले. माजी आमदार गोपालदास अग्रवाल यांनी योग्य वेळी काँगेस पक्षात परत येणाच्या निर्णय घेतल्याचेही म्हणाले.

कार्यक्रमात विरोधी पक्ष नेते विजय वड्डेटीवार, नितीन राऊत, सुनिल केदार, आमदार सहसराम कोरेटे आदींनी विचार व्यक्त केले. गोंदिया जिल्हा काँग्रेस अध्यक्ष दिलीप बनसोड यांनी स्वागत पर प्रास्तविक केले. संचालन अपुर्व अग्रवाल यांनी केले. राष्ट्रगितांने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

त्या नेत्यामुळेच मला आणि गोपालदास अग्रवाल यांना भ्रष्ट भाजपचा प्रवास करून यावे लागले. यात आम्हा दोघांना किती राजकीय त्रास सहन करावा लागला हे दोघांना ठाउक अल्याचेही नाना म्हणाले. आमचे नेते राहुल गांधी यांनी नेहमीच आरक्षणाच्या बाजूने भूमिका घेतली आहे. मात्र, विरोधी पक्षाचे नेते चुकीचा अर्थ काढून आमच्या नेत्यांविषयी गैरसमज पसरविण्याचे काम करीत आहेत. मुळात भाजप हा पक्षच आरक्षणाचा विरोधक आहे. आज ही ते जातीगत जनगणना करण्यास टाळाटाळ करते या वरून सामान्य नागरिकांनी आता यांच्यापासून सजग राहून संविधानाच्या रक्षणाकरिता संघटित राहून कांग्रेस पक्षाला आपला पाठिंबा दयावा असे आवाहन या प्रसंगी कांग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केले.

# देवरी येथे मुद्रांक विक्रेत्याकडून सामान्यांची लूट

## एकाधिकारशाहीमुळे विद्यार्थी व नागरिक त्रस्त: अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

**देवरी:** येथील तहसील कार्यालयाबाहेर मुद्रांक विक्री करणारे मुद्रांक विक्रेत्याच्या एकाधिकारशाहीमुळे नागरिक व विद्यार्थी त्रस्त झाले आहे. मुद्रांक घेण्याकरिता १०,२०,५० ते १०० रुपये अतिरिक्त द्यावे लागत असल्याने नागरिकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. याकडे मात्र वरिष्ठ अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष झाल्याचा आरोप आहे.

विद्यार्थ्यांसून सर्वच घटकाकरिता सामान्य माणसाचा मुद्रांकाशी (स्टॅम्प पेपर) संबंध येतो. विविध प्रमाणासाठी, डोमेसाइल सर्टिफिकेट, राष्ट्रीयत्व, जातीचा दाखला, सौदा पावती, करारनामा, प्रतिज्ञापत्र, खरेदी खत, वाटणी पत्र, तसेच कर्ज घेण्याकरिता स्टॅम्प पेपरचा उपयोग होतो. मात्र मूळ किमतीपेक्षा अधिक दराने मुद्रांकांची विक्री करुन सामान्यांची अडवणूक केली जात असल्याच्या तक्रारी देवरी येथे वाढल्या आहेत. शुक्रवारी (दि.१३) तहसील कार्यालयात एकमात्र मुद्रांक विक्रेता हिरालाल बोरकर यांच्याकडे अडीच हजार रुपयांचे स्टॅम्प पेपर घ्यायला पाठविले असता मुद्रांक विक्रेत्याने १७० रुपये अधिकचे मागितले. याबबात त्याला विचारणा केली असता व १७० रुपयांचे पक्के बिल मागितले असता त्याने देण्यास स्पष्ट नकार दिला. आम्हाला परवडत नसल्याने आम्ही दहा-वीस रुपये अतिरिक्त घेत असल्याचे त्याचे म्हणने होते.

### कमिशन मिळते तरी अतिरिक्त पैसे

**एकीकडे शासन मुद्रांक विक्रेत्यांना कोषागार मधून मुद्रांक खरेदी दरम्यान तीन टक्के कमिशन देत असते तरी सुद्धा मुद्रांक विक्रेता शंभर रुपयांच्या स्टॅम्प मागे दहा ते वीस रुपये तर ५०० च्या मागे पन्नास रुपये व हजारच्या स्टॅम्प मागे शंभर रुपये अधिकचे मागून नागरिकांची सर्रास लूट करीत आहेत. याबाबत दुय्यम निबंधकांना तक्रार केली असता त्यांनी त्याला एकदा माफ करा असे सांगितले.**

### मुद्रांक विक्रेत्याजवळ दरपत्रक लावण्याची मागणी

**मुद्रांक विक्रेत्यांकडून नागरिकांची व विद्यार्थ्यांची होत असलेली आर्थिक लूट लक्षात घेता मुद्रांक विक्रेत्याला मुद्रांक खरेदीदाराने किती रुपयाच्या स्टॅम्पसाठी किती रुपये द्यावे व कोणत्या कामासाठी किती रुपयाचे मुद्रांक लागेल. नागरिकांनी अधिकचे पैसे न दिल्यास अडवणूक करणाऱ्या मुद्रांक विक्रेत्याची तक्रार करण्यासंबंधीच्या सुचनांचे फलक लावण्यात यावे.**

### प्रतिज्ञापत्रासाठी मुद्रांकांची गरज नाही

**प्रतिज्ञा पत्रासाठी सरकारी कार्यालयात व न्यायालयात शंभर रुपये मुद्रांक शुल्काची आवश्यकता नाही. असे आदेश महाराष्ट्र वन व महसूल विभागाने एक जुलै २००४ अन्वये दिले आहेत. तरीही सरकारी कार्यालयांमध्ये प्रतिज्ञापत्रासाठी शंभर रुपयांचा मुद्रांक दस्तावेजांसाठी वापरत असल्याचे आढळून आले आहे.**



**देवरी येथे एकमात्र मुद्रांक विक्रेते हिरालाल बोरकर आहेत. कोषागार कार्यालयाकडून या विक्रेत्याला मागणीप्रमाणे सरकारी चालान भरुन रक्कम अदा केल्यानंतर मुद्रांक दिले जातात. प्रत्येक मुद्रांक मागे मुद्रांक विक्रेत्याला तीन टक्के कमिशन दिले जातात.**

**ओमप्रकाश उईके, उपकोषागार अधिकारी, देवरी**

# आमगाव शहरात चोरांचा धुमाकूळ



**गोंदिया :-** आमगाव शहरातील अनेक नगरात चोरांनी धुमाकूळ घातला आहे.१२ जुलै च्या मध्यरात्री चोरांनी रिसामा येथील पोस्ट ऑफीस मधील लॉकरला लक्ष करीत गॅस कटरने फोडून चोरीचा प्रयत्न केले.तर शहरात दुचाकी चोरांनी धुमाकूळ घालत दुचाकी चोरीचा सत्र सुरू केला आहे.

१२ जुलै च्या मध्यरात्री चोरांनी रीसामा परिसरात असलेले पोस्ट ऑफीस ला लक्ष करीत चोरीचा प्रयत्न केला. पोस्ट ऑफ्फ़ीस च्या दारावरील कुलूप तोडून आत शिरले व ऑफीस मध्ये ठेवलेली लॉकर गॅस कटरने फोडली . परंतु लॉकर रिकामे असल्याने चोरांना रोख रक्कम मिळाली नाही. त्यामुळे मोठे संकट यावेळी टळले. शहरात अनेक ठिकाणी चोरांनी आता बँक, एटीएम यांना लक्ष केले आहे.

आमगाव येथे शहरात अनेक ठिकाणी व्यावसायिक यांच्या मदतीने सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले होते. परंतु यांचे सुयोग्य नियोजन व देखरेख नसल्याने ते बंद पडली आहे. शहरातील मुख्य मार्गावर या सीसीटीव्ही कॅमेरे आता लागूनही उपयोग होत नसल्याने ही यंत्रणा फोल ठरली आहे.

# भाजपला विदर्भात बसणार मोठा फटका

**नागपूर:** राज्याच्या विधानसभा निवडणुका जाहीर होण्यापुर्वीच मोठ्या प्रमाणात राजकीय सर्व्हे बाहेर पडत आहे. यात कधी मविआ तर कधी महायुती पुढे दिसत आहे. काही सर्व्हेक्षणात दोघांमध्येही अटीतटीची लढत असल्याचे दिसत आहे. मधल्या काळात लोक पोल ने केलेल्या सर्वेक्षणात मविआकडे झुकते माप दिले. तर अन्य एका संस्थेच्या सर्व्हेत अटीतटीच्या लढतीत महायुतीकडे झुकते माप दिले. या सर्व्हेक्षणाच्या गर्दीत शुक्रवारला भाजपचा अंतर्गत सर्व्हे बाहेर पडला.

हा सर्व्हे कुणी केला, यावर अधिकृतपणे भाजपकडून कुणीही भूमिका मांडत नसले तरी त्यात विदर्भात महायुतीला व विशेषत: भाजपला मोठा फटका बसत असल्याचे दाखविले आहे. शुक्रवारी एका वृत्तवाहीनीवर हा अंदाज दाखविण्यात आल. त्यात भाजपचा अंतर्गत सर्व्हे असल्याचे म्हटले आहे. यानुसार विदर्भात विधानसभेच्या ६२ जागा आहेत. यात २०१९ च्या निवडणुकीत महायुतीकडे ३९ जागा आहे. तर २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत याच आकड्यात धक्कादायक बदल दाखविले जात आहे. त्यानुसार, महायुतीला ६२ पैकी २५ जागा मिळतील असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. यात भाजपच्या १८ जागा असतील. शिंदे सेनेला ५ तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला २ जागा मिळण्याचा अंदाज आहे. भाजपा असो की काँग्रेस विदर्भ हा या दोन्ही पक्षांचा राजकीय गड आहे. विदर्भाने निवडणुकीत या दोन पक्षाला भरभरुन दिले आहे. गेल्यावेळी लोकसभेत वैदर्भीयांनी भाजपच्या पारड्यात मते टकली होती. त्यावेळी १० पैकी ९ जागा भाजपला मिळाल्या होत्या. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत वैदर्भीयांनी काँग्रेस व मविआच्या पारड्यात मते टाकली. १० पैकी ८ जागांवर विजय मिळाला.




### जिल्ह्यात ४ जागाच

**धक्कादायक म्हणजे भाजपला नागपूर जिल्ह्यातील १२ पैकी केवळ ४ जागांवरच विजय मिळत असल्याचे म्हटले आहे. २०१९ च्या निवडणुकीत भाजपला जिल्ह्यातील १२ पैकी ७ जागा मिळाल्या होत्या. तर ५ जागा मविआच्या ताब्यात होत्या. यावेळी मविआच्या खात्यात ८ जागा तर भाजपला ४ जागा दाखवित आहेत. भाजपाचे जिल्ह्यातील संघटन बळकट आहे. शहर व जिल्ह्यात भाजपचे कार्यकर्ते जोमाने भिडले आहेत. वर्षभरापासून त्यांचे सुक्ष्म नियोजनही सुरु आहे असे असताना कमी जागा दाखविल्या जात असल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केल्या जात आहे. ज्या चार जागांचे अंदाज वर्तविले जात आहेत. त्यात नागपुरातील दोन व जिल्ह्यातील दोन जाागांचा समावेश आहे.**

# निकषाच्या व्यतिरिक्त ०.५ प्रति क्विंटल तुटीचे अनुदान जाहीर

## प्रफुल पटेल यांचा पाठपुरावा, धान खरेदी केंद्रांना मिळाला दिलासा

**गोंदिया:** खरीप हंगाम २०२३-२४ करिता किमान आधारभूत किंमत खरेदी अंतर्गत राज्य शासनाने धान खरेदी करण्याच्या अनुषंगाने काही नियम व अटी लावल्या होत्या. आधारभूत धान केंद्रानी खरेदी करुन साठवणूक केलेल्या धानाच्या घट व तुट यात केंद्र सरकारने अटी व नियम लावून ०.५ टक्के कपात केली होती. यामुळे धान खरेदी संस्थांना अडचणींचा नुकसानीचा सामना करावा लागत होता. यासाठी खा.प्रफुल पटेल यांनी राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांच्याकडे पाठपुरावा केला. परिणामी राज्य शासनाने नियमांच्या तुटव्यतिरिक्त ०.५ टक्के प्रति क्विंटल तुट देण्याचा निर्णय घेतला आहे.



खा.प्रफुल पटेल यांच्या पाठपुराव्याला यश आल्याने धान खरेदी करणाऱ्या संस्थांना दिलासा मिळणार आहे. तुटीच्या ०.५ टक्के कमी केल्याने खरेदी करणाऱ्या संस्था अडचणीत आल्या होत्या. दरम्यान, जिल्ह्यातील धान खरेदी संस्थांनी ही बाब खा.पटेल यांच्या निदर्शनास आणून दिली होती.

शेतकरी हित व शेतकऱ्यांच्या संस्थांचे हित जोपासून त्यांनी यसंदर्भात राज्य सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला. याचीच दखल घेत राज्य सरकारच्या अन्न व नागरी पुरवठा मंत्रालयाने ११ सप्टेंबर रोजी शासन निर्णय निर्गमित करुन केंद्र सरकारने जाहीर केलेल्या घटव्यातिरिक्त राज्य शासनाकडून प्रति क्विंटल ०.५ टक्के घट-तुट मंजूर केली आहे. यासाठी लागणारा १२.७० कोटी रुपयांचा अधिकचा निधी शासन निर्णयाद्वारे उपलब्ध करुन दिला आहे.

# अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीचे तत्काळ पंचनामे करा-पालकमंत्री आत्राम

## पूरपरिस्थीतीचा आढावा, मदतीपासून कोणीही वंचित राहणार नाही

**गोंदिया :** गोंदिया जिल्ह्यामध्ये मागील आठवडयात झालेल्या पावसामुळे शेतक?यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. हजारो हेक्टर पीके पाण्याखाली गेले हाता तोंडाशी आलेले पीक जमीनदोस्त झाल्याने शेतकऱ्यांसमोर आर्थिक अडचण निर्माण झाली आहे. त्यामुळे अतिवृष्टीने नुकसान झालेल्या पिकांचे तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी संबंधित यंत्रणांना दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आज पूरपरिस्थिती बाबत आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी ते बोलत होते. यावेळी खासदार डॉ.प्रशांत पडोळे, जिल्हाधिकारी प्रजित नायर, मुख्य कार्यकारी अधिकारी एम.मुरुगानंथम, पोलीस अधीक्षक गोरख भामरे, निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे, माजी आमदार राजेंद्र जैन, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे यांचेसह सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार व इतर विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. आत्राम पुढे म्हणाले, गोंदिया जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे पूरग्रस्थांना शासनाच्या नियमानुसार आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या वतीने मदत देण्यात येणार असून मदतीपासून कोणीही वंचित राहणार नाही असे त्यांनी सांगितले.

खासदार डॉ.प्रशांत पडोळे म्हणाले, अतिवृष्टीमुळे झालेल्या पूरग्रस्त भागाचे सर्वे करुन नुकसानग्रस्थांना सरसकट नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

जिल्ह्यात मान्सून कालावधीत जून ते सप्टेंबर या चार महिन्यात १२२०.०३ मि.मी. पाऊत होतो. परंतु यावर्षी १५ सप्टेंबर २०२४ पर्यंत १२७४.१ मि.मी. पाऊस पडलेला आहे. म्हणजे एकूण पावसाचा ११४.३ टक्के पाऊस झालेला आहे. गोंदिया जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे सर्व आठही तालुक्यात पूरपरिस्थिती निर्माण झाली होती. या दरम्यान पाच व्यक्ती मृत झाले. २०८९ घरांचे अंशत: तर ४३ घरांचे पुर्णत: नुकसान झाले आहे. ५१८ गोठ्यांचे नुकसान झाले.



लहान-मोठी एकूण ५३ पशुहानी झाली आहे. अतिवृष्टीमुळे चार हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. प्रशासनातर्फे युध्द पातळीवर जिल्ह्यातील आठही तालुक्यात झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याची कार्यवाही सुरु असून पंचनामे झाल्यानंतर झालेल्या नुकसानीकरीता शासनास प्रस्ताव सादर करण्यात येणार व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना लवकरावत लवकर लाभ मिळवून देण्याची कार्यवाही करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी सांगितले.

या दौऱ्यादरम्यान पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी पूरग्रस्त बिरसोला गावाला भेट देवून फ़ुलचूर येथील रामेश्वर कॉलनीमधील इमारत कोसळलेल्या अग्रवाल कुटुंबियांकडे सांतवना भेट दिली.

# आमदार विजय रहांगडाले यांनी पुरग्रस्त गावाची पाहणी करून पंचनाम्याचे दिले निर्देश

**गोंदिय:-** दिनांक ०९ सप्टेंबर रोज सोमवारला मध्यरात्रीपासून ढगफुटीसदृश पाऊस आल्याने मोठया प्रमाणात नदी नाल्यांना पूर येवून पुराचे पाणी शेतकऱ्यांच्या शेतात साचले असल्याने उभ्या धानपिकाचे नुकसान झाले तसेच कित्येक जागी घरेसुद्धा पडली याची दखल घेत आमदार महोदयांनी जिल्हाधिकारी महोदयांना पत्राद्वारे तातडीने पंचनामे करण्याबाबत निर्देश दिले जेणेकरून नुकसानग्रस्त शेतक-याना नुकसानीची भरपाई शासनाकडून मिळण्यास मदत होईल तसेच घाटकुरोडा, चांदोरी खुर्द, किंडगीपार, महालगाव, धापेवाडा या गावी घटनास्थळी जावून मौका तपासणी केली.



या पाहणी दरम्यान उपविभागीय अधिकारी पूजा गायकवाड, प्र.तहसिलदार अजय संकुदरवार,तालुका कृषी अधिकारी गेंदलाल उके, प्र.गटविकास अधिकारी शितेश पटले, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती जितेंद्र रहांगडाले, जि.प.सदस्य चत्रभुज बिसेन, विजय उईके, पं.स.उपसभापती हुपराज जमाईवर, प.स.सदस्य चेतलाल भगत, मा.उपसभापती ब्रिजलाल रहांगडाले व संबंधित गावातील सरपंच व शेतकरी व तलाठी उपस्थित होते.